बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्ह्यात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर / November
शनिवार / Saturday
दि.२८ / Dt: 28
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

www.jagmitra.com

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३६/Issue 36 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

गेवराई पोलीस ठाणे बनलेय लाचखोरीचा बालेकिल्ला!

► रक्षकच जर भक्षक बनले, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कोणाकडे?

कायद्याचे धडे देणारेच गुन्हेगारांसारखे पळू लागले, तर बीड पोलिसांची प्रतिमा कशी राहणार?

आरोपींना वाचवण्यासाठी लाखोंची लाच घेणारा तो पोलीस निरीक्षक कोण? प्रकरण दडपण्याचा वरिष्ठांकडून प्रयत्न?



एसपी साहेब, भ्रष्टाचाराच्या या किडीचा बंदोबस्त कधी?

एकापाठोपाठ एक कारवाया होऊनही गेवराई पोलीस ठाण्यातील लाचखोरांना कायद्याचा वचक राहिलेला नाही, हेच या घटनांवरून स्पष्ट होते. जर पोलीस ठाण्यातच खुलेआम रेटकार्ड लावून कामे होत असतील, तर सामान्य माणसाने दाद कोणाकडे मागायची? बीडच्या पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन केवळ गुन्हे दाखल करण्यावर न थांबता, गेवराईतील भ्रष्टाचाराच्या या किडीचा कायमचा बंदोबस्त करावा आणि या भ्रष्ट साखळीचे कंबरडे मोडण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी तीव्र मागणी नागरिकांमधून होत आहे.

गेवराई/जगमित्र न्यूज

रक्षकाच्या भूमिकेत असलेल्या खाकी वर्दीनेच आता भक्षकाचे रूप धारण केल्याचे धक्कादायक चित्र गेवराई पोलीस ठाण्यात पाहायला मिळत आहे. अवघ्या काही आठवड्यांत लाचखोरीच्या लागोपाठ दोन घटना उघडकीस आल्याने, गेवराई पोलीस ठाणे हे कायदा-सुव्यवस्थेचे केंद्र राहिले आहे की भ्रष्टाचाराचा बालेकिल्ला, असा संतप्त सवाल सामान्य जनता विचारत आहे. नागरिकांना न्याय देण्याऐवजी त्यांच्या खिशावर दरोडा टाकणाऱ्या या लाचखोर प्रवृत्तींमुळे संपूर्ण बीड जिल्ह्याच्या पोलीस दलाची अब्रू चव्हाट्यावर आली आहे. चोरीस गेलेली स्विफ्ट कार शोधून देण्याचे आपले कर्तव्य पार पाडल्यानंतर, ती कार मूळ मालकाच्या ताब्यात देण्यासाठी गेवराई पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार पांडुरंग उत्तम दराडे याने चक्क ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. गुरुवारी (दि. २६) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला असता, दराडे याने कारमध्येच लाचेची रक्कम स्वीकारली. मात्र, एसीबीच्या पथकाचा सुगावा लागताच या लाचखोर अंमलदाराने कायद्याचा धाक बाजूला सारून थेट कार पळवत घटनास्थळावरून फिल्मी स्टाईल धूम ठोकली. रक्षकच गुन्हेगारासारखा पळून गेल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली असून, फरार दराडेविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेवराई पोलिसांची ही लाचखोरी नवीन नाही. यापूर्वी २९ ऑक्टोबर रोजीही असाच लाजिरवाणा प्रकार घडला होता. जप्त केलेली रिक्षा सोडण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया बाजूला ठेवून, खाकीचा धाक दाखवत एका गरीब रिक्षाचालकाकडे अवघ्या एक हजार रुपयांची लाच मागण्यात आली होती. याप्रकरणी एसीबीने कारवाई करत सहायक पोलीस उपनिरीक्षक नितीन संताराम शिंदे (वय ४८) आणि पोलीस हवालदार रामराव केशव आघाव (वय ४६) यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. अवघ्या एक हजाराच्या तुकड्यासाठीही हात पसरणाऱ्या या कर्मचाऱ्यांमुळे पोलिसांची प्रतिमा पार धुळीला मिळाली होती.



वरिष्ठांच्या भूमिकेवर संशयाचे धुके;कारवाई अद्याप गुलदस्त्यातच!

कायद्याचे रक्षकच जर भक्षक बनून गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहणार असतील, तर सर्वसामान्य जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडे ठेवायची? असा संतप्त सवाल सध्या बीड जिल्ह्यात उपस्थित केला जात आहे. काही दिवसांपूर्वी एका पोलीस निरीक्षकाने आरोपींना मदत करण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांकडून तब्बल लाखों रुपयांची लाच घेतल्याची खळबळजनक बातमी सोशल मीडिया आणि वृत्तमाध्यमांवर वाऱ्यासारखी पसरली होती. मात्र, इतका गंभीर प्रकार समोर येऊनही अद्याप त्या लाचखोर पोलीस निरीक्षकाचे नाव अधिकृतपणे उघड का करण्यात आले नाही? यावरून पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जनतेच्या मनात सध्या एकच प्रश्न घर करून आहे तो पोलीस निरीक्षक नेमका कोण? आणि त्याला कोणाचा राजकीय किंवा प्रशासकीय वरदहस्त आहे? इतकी मोठी लाचखोरी समोर आल्यानंतरही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी मौन का बाळगले आहे? हे प्रकरण वरिष्ठ पातळीवरून जाणीवपूर्वक दाबण्यात आले असल्याची जोरदार चर्चा सध्या बीडच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात सुरू आहे. जर एखाद्या सामान्य कर्मचाऱ्याने छोटीशी चूक केली तर तात्काळ कारवाईचा बडगा उगारला जातो, मग लाखोंची लाच घेणाऱ्या या निरीक्षकावर मेहरबानी कशासाठी? या गंभीर प्रकाराची चौकशी नेमकी कोणाकडे सोपवली आहे आणि आजतागायत या प्रकरणात काय कारवाई झाली, याची कोणतीही माहिती प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेली नाही. संपूर्ण कारवाई गुलदस्त्यात ठेवून संबंधित अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.

कुंडलिका पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा बोजवारा; निकृष्ट दर्जामुळे नागरिकांना मनस्ताप!

मठ गल्लीतील नळजोडणीनंतर पाणी सोडताच पाइपलाइनला गळती

धारूर/अतुल शिनगारे

धारूर शहरात कुंडलिका पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विविध भागांत नवीन पाइपलाइन टाकणे आणि नळजोडणीची कामे सुरू आहेत. मात्र, या कामांच्या दर्जाकडे नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता वाघ यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, योजनेच्या कामात अनेक त्रुटी समोर येत असून, निकृष्ट कामाचा फटका थेट नागरिकांना सहन करावा लागत आहे.

शहरातील मठगल्ली परिसरात नुकतीच नळजोडणी करण्यात आली. मात्र, कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने पंधरा दिवसांनंतर पाणीपुरवठा सुरू करताच अनेक ठिकाणी नळाचे पाइप आणि जोडण्या लिकेज झाल्या. पाइपलाइनमधून पाण्याचा मोठ्या प्रमाणात प्रवाह सुरू झाल्याने पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडाला. पंधरा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पाणी मिळण्याची अपेक्षा असताना पहिल्याच पाणीपुरवठ्यात गळतीच्या समस्येला सामोरे जावे लागल्याने मठ गल्लीतील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



पाणीपुरवठा अभियंता वाघ यांच्या दुर्लक्षाचा आरोप, मुख्याधिकाऱ्यांनी कारवाई करण्याची मागणी

विशेष म्हणजे, शहरात सुरू असलेल्या या महत्त्वपूर्ण पाणीपुरवठा योजनेच्या कामावर संबंधित अभियंत्यांचे नियमित लक्ष असणे अपेक्षित आहे. मात्र, अभियंता वाघ हे बीड येथूनच कामकाज पाहत असल्याने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी देखरेखीचा अभाव निर्माण होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी, कंत्राटदारांकडून मनमानी पद्धतीने कामे केली जात असून, कामावरील सुपरवायझर - मजूर हे दादागिरी ची भाषा करत आहेत परिणामी याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. चालू (पान २ वर)



महाविद्यालये बनलीत वासनेचे अड्डे? सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

नापास करण्याची धमकी देत ११ महिने वैद्यकीय विद्यार्थिनीचे लचके तोडणाऱ्या नराधम प्राध्यापकाला बेड्या!

बीड/प्रतिनिधी

शिक्षकी पेशाला आणि पवित्र गुरु-शिष्य नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि किळसवाणी घटना बीड शहरात उघडकीस आली आहे. होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका २२ वर्षीय विद्यार्थिनीला परीक्षेत नापास करण्याची भीती दाखवून तब्बल ११ महिने तिचा लैंगिक छळ करणाऱ्या नराधम प्राध्यापकाच्या मुसक्या शिवाजीनगर पोलिसांनी आवळल्या आहेत. डॉ. अनिस अहमद असे या विकृत आरोपी प्राध्यापकाचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित २२ वर्षीय विद्यार्थिनी बीडमधील एका होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. गेल्या जानेवारी २०२६ पासून आरोपी प्राध्यापक डॉ. अनिस अहमद याची या विद्यार्थिनीवर वाईट नजर होती. महाविद्यालयात उपचार आणि वैद्यकीय तपासणी करण्याच्या बहाण्याने या नराधमाने विद्यार्थिनीशी वारंवार अश्लील चाळे करत तिचा लैंगिक छळ केला. हा प्रकार बाहेर फुटू नये म्हणून या विकृत प्राध्यापकाने अधिकाराचा गैरवापर करत पीडितेवर दहशत निर्माण केली होती. ''याबद्दल कोणालाही काही सांगितले, तर परीक्षेत कमी गुण देऊन नापास करेन आणि पुढील पाच वर्षे एकाच वर्गात बसवून ठेवेन,'' अशी थेट करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी त्याने पीडितेला दिली होती. भविष्याच्या भीतीपोटी ही विद्यार्थिनी तब्बल ११ महिने हा अन्याय निमूटपणे सहन करत होती. अत्याचाराची सीमा पार झाल्यानंतर पीडित विद्यार्थिनीने धाडस एकवटून थेट शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठले आणि या नराधम प्राध्यापकाचा काळा चेहरा पोलिसांसमोर उघड केला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ विविध गंभीर (पान २ वर)

धारूर शहरात चोरट्यांचा धुमाकूळ; चार दुकानांचे शटर फोडले

धारूर/अतुल शिनगारे

धारूर शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, गुरुवारी (दि. २७ नोव्हेंबर) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चार दुकानांचे शटर फोडून चोरीचा प्रयत्न केला. यामध्ये तीन सराफी दुकाने आणि एका इलेक्ट्रिक दुकानाचा समावेश आहे. मात्र, पहारेकऱ्याच्या सतर्कतेमुळे चोरट्यांचा डाव उधळला गेल्याने मोठी चोरी टळली. या घटनेमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातील मुख्य रस्त्यालगत हनुमान मंदिराच्या पाठीमागील दोन सराफी दुकाने, लाकडी मशीनसमोरील एक सराफी दुकान आणि एका



आज आ.प्रकाश दादांच्या हस्ते वडवणी नगरपंचायतीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी शहराच्या विकासप्रवासात मानाचा तुरा रोवणारा आणि नगरपंचायतीच्या प्रशासकीय वाटचालीला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण क्षण आता जवळ आला आहे. तब्बल ६ कोटी ३० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या वडवणी नगरपंचायतीच्या भव्य व नूतन प्रशासकीय इमारतीचा उद्घाटन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या शनिवार,दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेला निधी, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकारलेल्या व शहराच्या वैभवात मैलाचा दगड ठरेल अशा या नेत्रदिपक अशा प्रशासकीय वास्तूचे लोकार्पण आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या शुभहस्ते होणार आहे. त्यामुळे वडवणी शहराच्या विकासाच्या इतिहासात हा सोहळा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे.



वडवणी नगरपंचायतीच्या (पान २ वर)

प्रवाशांच्या जीवाशी खेळ; परळी आगारातील अस्वच्छतेची युवा सेनेकडून दखल

कैलास कावरे यांची परिवहन मंत्र्यांकडे तक्रार, चौकशीची केली मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी आगारातील स्वच्छतेच्या कामात मोठ्या प्रमाणात अनागोंदी सुरू असून आगारप्रमुख व क्रिस्टू कंपनीच्या मिलीभगतीने प्रवाशांची लूट होत असल्याचा गंभीर आरोप युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी केला आहे.

सदर निवेदन युवासेना कार्याध्यक्ष आदरणीय पूर्वेशजी सरनाईक साहेब, युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे साहेब, किरण साळी साहेब, शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण, विपुल पिंगळे, युवासेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश भैय्या लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. याबाबत त्यांनी



राज्याचे परिवहन मंत्री मा. ना. श्री. प्रतापजी सरनाईक साहेब यांच्याकडे संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. पुढे कावरे यांनी निवेदनात म्हटले आहे की, परळी आगारात गेल्या अनेक महिन्यांपासून आगारप्रमुख श्री. सोनवणे यांची व क्रिस्टो कंपनीची मनमानी व अनागोंदी कारभार सुरू आहे.

नियमाप्रमाणे दररोज प्रत्येक बस मागे एक स्वच्छता कर्मचारी असणे व प्रवासी बसची स्वच्छता ठेवणे आवश्यक असताना तसे न करता जाणीवपूर्वक स्थानिक पातळीवर दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे परळी आगारात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरली असून कोणतीही प्रवासी बस स्वच्छ नसते. यामुळे प्रवाशांना व नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत असून प्रचंड त्रास सहन करावा (पान २ वर)



28 Nov 2026 page 2_Layout 1 11/27/2026 11:34 PM Page 1



एकविशी, एकतिशी ते पन्नाशी

बदल हा जगाचा नियमच. पण गेल्या अवघ्या ११ वर्षांत जग किती बदलले याची जाणीवही त्रासदायक ठरू शकते. त्या ११ वर्षांपूर्वीच्या जगात करोनासारखी साथ पसरेल असे कुणाच्या गावीही नव्हतेच; उलट २००८ च्या आर्थिक संकटातून अमेरिकादी प्रगत देश बाहेर पडत होते. इराणसारख्या एककल्ली देशाशी वाटाघाटी करून अमेरिकी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी इराण अण्वस्त्रबंदी करार घडवत आणला होता आणि ब्रिटनमध्ये २०१५ च्या अखेरपर्यंत मब्रेग्झिटफ हा हसण्याव-ारीच नेण्याचा विषय होता. एकंदर नवी युद्धे होत नव्हती, जुनी मिटवली जात होती. चीन बलवान असूनही तैवान ते गलवान यांकडे हैवानदृष्टीने पाहात नव्हताः ही यादी बरीच लांबवता येईल. कुणाला हे स्मरणरंजन वाटेल. पण इथे हेतू तो नाही. जग म्हणून आपण गेल्या ११ वर्षांत उमेदीकडून कमालीच्या आत्मकेंद्री हेकटपणाकडे गेलो, हेच संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदलविषयक जागतिक परिषदेच्या नुकत्याच आटोप-लेल्या ३१ व्या खेपेने -- म्हणजे कॉन्फरन्स ऑफ पार्टीज अर्थात मकॉप ३१फने -- दाखवून दिले. ती कशी, हे तपासण्यासाठी पॅरिस येथे २०१५ सालच्या मकॉप २१फमध्ये काय झाले होते, हे आठवणेही आवश्यक. कारण पॅरिसमधल्या त्या परिषदेत जगातील देश एकत्र येऊन अशक्य गोष्टसुद्धा शक्य करू शकतात, अशी उमेद जागवली होती. ही अशक्य बाब तेल-अवलंबित्वाची. इंधन म्हणून वापरले जाणारे खनिज तेल जगातील सर्वच देशांनी कमी वापरून कार्बन उत्सर्जन घटवायचे. त्यासाठी आपापली राष्ट्रीय उद्दिष्टपत्रिका ठरवायची, सर्वांनीच एकदिलाने असा रेटा देऊन पृथ्वीची तापमानवाढ उद्योगपूर्व तापमानाहून दीड अंश सेल्सिअस जास्त इतक्याच पातळीवर रोखायची, असा ठराव पॅरिसच्या मकॉप-२१फमध्ये सर्वानुमते मंजूर झाला. या कराराशी कायद्याने बांधील राहण्याच्या मसुद्यावर सर्व देशांनी स्वाक्षर्या केल्याः ते २०१५ हे वर्ष आता अधिकृतपणे स्मरणरंजनात जमा करावे लागेल. याचे कारण, परवाच्याच रविवारी संपलेली मकॉप-३१फ परिषद कोणत्याही ठरावाविना पूर्णत: बारगळली. एकतर हल्ली या परिषदांना अमेरिकेची गैरहजेरीच असते. तेथील अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना हवामान बदल, तापमानवाढ हे सारेच अमान्य. याआधीच्या मकॉपफमध्ये सहभागी होऊनही अमेरिकेसह सारेच देश आपापला हट्ट कायम ठेवत; पण काहीएक देवाणघेवाण झाल्यासारखे अखेर दाखवत. तरीही मखनिज तेलाचा वापर कमी करूफ अशी ग्वाही देण्यास कां-कू करत. यात विनोदी विरोधाभास असा की, मआम्ही सारे खनिज तेलाचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करूफ असा ठराव यापूर्वी मकॉप २८फमध्ये झाला, ती २०२३ सालची परिषद भरली होती तेलाच्याच पैशावर उभारलेल्या दुबईत. त्याहून हास्यास्पद म्हणजे, या ठरावात मटप्प्याटप्प्यानेफ असा शब्द पेरून तो सर्वांकडून मंजूर करवून घेण्याची मखलाशी केली होती ती संयुक्त अरब अमिरातींच्या सर्वात मोठ्या तेलकंपनीचे प्रमुख सुल्तान अल जबैर यांनी. ही एक प्रकारची लबाडीच- कारण मटप्प्याटप्प्यानेफ म्हणजे कधी? हे टप्पे किती आणि एकेक टप्पा केवढा? यापैकी कशाकशाचीही स्पष्टता या करारात नसेल, याची पुरेपूर काळजी घेण्यात आली होती. हाच मोघमपणा पॅरिसच्याही मकॉप-२१फ करारात होता, असे आता म्हणावे लागते. तेव्हा सारे देश म्हणाले होते- आम्ही आ-पापली राष्ट्रीय उद्दिष्टे ठरवून तापमानवाढ रोखण्यास हातभार लावू. ती उद्दिष्टे २०५० सालापर्यंत की येत्या ५० वर्षांत साध्य करायची, यावर आधी दुमत झाले. मग आणखी फाटे फुटून देश तितकी मते झाली.

संत श्री आशारामजी बापू वरील होत असलेल्या अन्याया विरोधात नाशिक मध्ये २९ नोव्हेंबरला तीव्र जनआंदोलन

मागील तेरा वर्षापासून राजकीय षडयंत्र अंतर्गत ९० वर्ष वयोवृध पूज्य बापूजींना जोधपूरच्या कारागृहामध्ये ठेवण्यात आले असून मागील बारा वर्षांमध्ये त्यांना मानव अधिकारांतर्गत एक दिवस ही पॅरोल सुद्धा दिली गेली नव्हती इतकेच काय तर त्यांची पत्नी मध्ये ऍडमिट असताना देखील त्यांना भेटण्यासाठी सुद्धा त्यांना सोडण्यात आले नाही या वयात त्यांना काय भेटणार बोलणार व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे बोला असे अमानवीय वक्तव्य न्यायाधीशांद्वारे करण्यात आले. आज मोठमोठ्या आतंकिला राज नेत्यांना अभिनेत्यांना तात्काळ बेल मिळते, रात्रीतून त्यांच्यासाठी कोर्ट उघडते आणि ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आपल्या सनातन संस्कृतीच्या प्रचारासाठी लावले कित्येक धर्मांतरित झालेल्या लोकांना परत हिंदू धर्मात आणले पाश्चात्त्य संस्कृतीच्या वेगाने फोफावत असलेल्या प्रभावाला कुचा-लीरीतीला आळा घालण्यासाठी व्हॅलेंटाईन डे ऐवजी मातृ पितृ पूजन कार्यक्रम, तुलसी पूजन कार्यक्रम सुरू केला जो आजही संपूर्ण देश विदेशामध्ये साजरा होत आहे. कत्त-लखान्याला जाणाऱ्या हजारो गाई वाचवल्या, कित्येक भूकंपग्रस्तांना घरे बांधून दिली, भजन करो, भोजन करो और रोजी पाओ सारख्या योजना चालवल्या. आयुर्वेदाचा प्रचार केला ज्या आजारासाठी दवाखान्यात लाखो रुपये लागतात ते अगदी २०० ते ५०० रुपयांच्या औषधांमध्ये बरे होतात. विशेष म्हणजे मेडिकल रिपोर्ट मध्ये क्लीनचीट असताना कोणत्या आधारे त्यांना शिक्षा दिली गेली हे त्यांचा साधक वर्ग विचारत आहे.

नुकतेच गोदरा ट्रेन अग्निकांड चा आर-ोपी याची उम्र कैद ची शिक्षा रद्द करून त्याला सोडून देण्यात आले पण ज्यांनी संस्कृतीसाठी एवढे कष्ट सोसले त्यांना जेलमध्ये कित्येक वेळा मारण्याचा प्रयत्न झाला, हॉस्पिटलमध्ये कोरोना काळात ही एक दिवसात तीन-तीन रेमेडीसिवीर देण्यात आले, कितीतरी संशयापद कृत्य दिसून येत आहेत व त्यांचा मुख्य अहमदाबाद आश्रम जी जाबल्य ऋषींची तपस्थळी आहे तिलाही ऑलिंपिक स्टेडियम बनवण्याच्या नावाखाली हडपण्याचा प्रयत्न होत आहे. स्वतःला हिंदुत्ववादी म्हणणाऱ्या सरकारकडून हिंदू साधू संतांना अशाप्रकारे प्रताडीत केले जात आहे या होणाऱ्या अन्यायाविरोधात १९ नोव्हेंबरला देखील मुंबई आझाद मैदानावर त्यांच्या अनुयायांकडून व अनेक हिंदू संघटना कडून पहिले आंदोलन छेडले ज्यामध्ये तीन प्रमुख मागण्या आहेत १)बापूजींना त्यांच्या इच्छेनुसार योग्य आयुर्वेदिक उपचार मिळावा २) बापूजींच्या केसची सीबीआय चौकशी व्हावी ३) अहमदाबाद मुख्य आश्रम सुरक्षित रहावे व बापूजींना तात्काळ न्याय मिळावा यासाठी येणाऱ्या २९ नोव्हेंबर रोजी नाशिक मध्ये विशाल जनआंदोलन करण्यात येणार आहे त्यासाठी सर्व हिंदू सनातन प्रेमींनी एकजूट होऊन होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी एकत्र यावे असे आवाहन परळी आंबेजोगाई बीड लातूर परभणी नांदेड येथील सर्व हरी ओम युवा संघटना तसेच स्थानिक श्री योग वेदांत सेवा समितीच्या वतीने करण्यात येत आहे यामध्ये हिंदू सेना राष्ट्राध्यक्ष श्री धनंजय देसाई, सुप्रीम कोर्टाचे वकील माननीय अश्विनी उपाध्याय, दक्षिण पीठ शंकराचार्य, सुदर्शन न्युज चैनल चे संस्थापक सुरेश चव्हाणके व इतर अनेक हिंदुत्ववादी संघटना प्रमुख उपस्थित असणार आहेत कार्यक्रमाचे स्थळ : - दही पुलाजवळ, गौरी पटांगण, रोकड महाराज मंदिरासमोर, पंचवटी नाशिक वेळ:- दुपारी २ ते ६ वाजेपर्यंत तारीख २९ नोव्हेंबर

हरिओम युवा संघटना परळी अंबाज-ोगाई ग्रुप

पान १ वरून....

मनस्ताप!

असलेल्या कामाचा दर्जा तपासणारी यंत्रणा नेमकी काय करते, असा सवाल उपस्थित होत आहे. यासंदर्भात पाणीप-ुरवठा विभागाचे इंजिनियर वाघ यांच्याशी संपर्क केला आता कामानिमित्त बीडला आलेलो आहे संबंधित यंत्रणेला सांगून पाईपलाईन नळ जोडणी दुरुस्ती करून घेतली जाईल असे सांगितले.

मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे!

कुंडलिका पाणीपुरवठा योजना ही शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, तिच्या कामात हलगर्जीपणा आणि निकृष्ट दर्जा खपवून घेतला जाऊ नये. मुख्याधिकाऱ्यांनी मटगल्लीसह शहरातील सुरू असलेल्या सर्व कामांची प्रत्यक्ष पाहणी करून गुणवत्ता तपासणी करावी. निकृष्ट कामे करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. उर्वरित कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित यंत्रणेला द्याव्यात, अशी मागणी शहरातील नागरी सह मठ गल्लीतील नागरिकांकडून होत आहे.

.....

धुमाकूळ

इलेक्ट्रिक दुकानाला चोरट्यांनी लक्ष्य केले. दुकानांचे शटर तोडून आत प्रवेश केल्यानंतर मौल्यवान वस्तू ठेवलेली कपाटे फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांकडून सुरू होता.दरम्यान, रात्रीच्या वेळी पहारा देणाऱ्या गुरख्याला संशयास्पद हालचाली जाणवल्या. त्याने तत्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने चोरट्यांनी तेथून पळ काढला. पहारेकऱ्याच्या प्रसंगावधानामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान टळले. शहरातील मध्यवर्ती भागात एकाच रात्री चार दुकानांचे शटर फोडण्याची घटना घडल्याने पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, शहरातील रात्रीची गस्त वाढवावी आणि व्यापारी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

.....

उद्घाटन

नूतन प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी सुरुवातीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आणि आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या विशेष प्रयत्नांतून तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. या निधीमुळे इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली. मात्र, प्रशासकीय इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आणखी निधीची आवश्यकता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेवून नगरपंचायतीचे माजी गटनेते शेषेराव बाप्पु जगताप यांनी अतिरिक्त निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून आणखी १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. अशा प्रकारे एकूण ६ कोटी ३० लाख रुपयांच्या भरीव निधीतून वडवणी नगरपंचायतीची ही भव्य, आकर्षक आणि सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी राहिली आहे. केवळ एक प्रशासकीय इमारत म्हणून नव्हे, तर शहराच्या विकासाची दूरदृष्टी, लोकप्रतिनिधींचे प्रयत्न आणि स्थानिक पातळीवरील पाठपुराव्याचे फलित म्हणून या वास्तूकडे पाहिले जात आहे. अनेक वर्षांपासून अपेक्षित असलेल्या सुसज्ज प्रशासकीय सुविधांना या इमारतीच्या माध्यमातून नवे बळ मिळणार आहे. या उदघाटन सोहळ्याचे उदघाटक म्हणून माजी मंत्री तथा माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपस्थित राहणार असून, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणीच्या नगराध्यक्षा वंदनाताई शेषेराव जगताप असणार आहेत. व प्रमुख उपस्थितीमध्ये नगरपंचायत प्रशासन बीडचे सहाय्यक आयुक्त संभाजी वाघमारे यांची उपस्थिती राहणार आहे. याशिवाय माजी जिल्हा परिषद सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ आण्णा मुंडे, माजलगांवचे नगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, धारुरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणीचे सभापती संभाजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव आळणे, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथराव म्हेत्रे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे, ज्येष्ठ नेते अंकुशराव शिंदे, गटनेते तथा सभापती अस्लम भैय्या कुरेशी, माजी सरपंच गंपूशेठ पवार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष महादेवदादा उजगरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच या सोहळ्याला नगरपंचायतीचे सर्व सन्माननीय सभापती व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सभापती सौ.रंजना नागनाथ डिगे, सभापती सौ.मिरा सुधीर ढोले, सौ.मिनाक्षी संभाजी शिंदे, सौ.मंगल राजाभाऊ मुंडे, सौ.द्रौपदी भगवान वाघमारे, सचिन शिवराम सानप, सौ.किस्किंदा दिनकरराव आंधळे, गिन्यानदेव वालू राठोड, सौ.महताबी अब्दुलरौफ पठाण, सौ.मिरा भीमराव उजगरे, सौ.नेहा नागेश आळणे, हरिदास किसनराव टकले, सौ.रुपिका विनय नहार, सौ.उषा उत्तम घाडगे, गुरुप्रसाद लक्ष्मणराव माळवदे आणि अरुण सुरेश मुंडे यांचा समावेश आहे. तसेच शहरातील माजी नगरसेवक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक आणि शहरव-ासीय मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट नानासाहेब निगळ तसेच नगरपंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. तरी या ऐतिहासिक लोकार्पण सोहळ्यास सर्व मान्यवर, नागरिक, हितचिंतक आणि वडवणीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. शनिवारचा हा दिवस वडवणीकरांसाठी केवळ नव्या इमारतीच्या उदघाटनाचा नसून, शहराच्या प्रशासकीय विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण पर्वाचा साक्षीदार ठरणार आहे!

नागरिकांच्या सेवेसाठी आधुनिक प्रशासकीय केंद्र!

नगरपंचायतीची ही नूतन इमारत शहराच्या प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी, नागरी सुविधांसाठी आणि प्रशासकीय सेवांसाठी एकाच ठिकाणी अत्याधुनिक सुसूत्र व सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

वडवणी शहराची नवी ओळख

एकूणच, ६ कोटी ३० लाख रुपयांच्या निधीतून साकारलेली ही भव्य प्रशासकीय इमारत म्हणजे वडवणी शहराच्या विकासाची नवी ओळख ठरणार आहे. दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मिळालेला निधी, आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांचा अतिरिक्त निधीसाठीचा पाठपुरावा या सर्वांच्या योगदानातून ही वास्तू प्रत्यक्षात साकारली आहे.

.....

प्रश्न ऐरणीवर!

कलमांन्वये गुन्हा दाखल करत आरोपी डॉ.अनिस अहमद याला बेड्या ठोकल्या आहेत. या धक्कादायक प्रकारामुळे बीडमधील शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. ज्या प्राध्यापकांच्या भरवशावर पालक आपल्या मुलींना शिक्षणासाठी पाठवतात, तेच जर भक्षक बनत असतील, तर मुलींनी कोणावर विश्वास ठेवायचा? असा संतप्त सवाल आता विच-ारला जात आहे. या विकृत प्राध्यापकावर कठोरात कठोर कारवाई करून त्याला निलंबित करावे, अशी मागणी विद्यार्थी संघटना आणि नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

.....

जीवाशी खेळ

लागत आहे. स्वच्छतेचे काम ज्या क्रिस्टू कंपनीकडे आहे, त्या कंपनीकडे लक्ष न देता कंपनी व आगारप्रमुख यांची मिलीभगत असून स्वच्छतेचे काम केले जात नाही. प्रत्यक्षात काम न करता लाखो रुपये हडप केले जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तरी या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ व निःपक्षपाती चौकशी करून दोषी आगारप्रमुख व क्रिस्टू कंपनीवर कडक कारवाई करण्यात यावी व परळी आगारातील प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित व चांगली सेवा मिळवून द्यावी, अशी मागणी परळी युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे परिवहन मंत्री यांच्याकडे केली आहे.

शेवटच्या पानावरून...

युवा महोत्सव

योगदानाबद्दल या युवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा युवा अधिकारी, बीड यांच्या वतीने या शिष्टमंडळाची निवड करण्यात आली होती. बीड येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या प्रमुख उपस्थितीत या कलाकारांनी आपली कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली होती. यामध्ये तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अंकिता जाधव हिने पिकलं जांभूळ तोडू नका या बहारदार लावणीवर तर केज येथील साने गुरुजी विद्यालयाची विद्यार्थिनीने कु. गौरी आश्रोबा घुले हिने आपल्या चढविला पट्टा कमरेवरी या लावणी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. तसेच इन्फिनिटी डान्स ग्रुपच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लल्लाटी भंडार या गाण्यावरील नृत्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महोत्सवाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी मानले. जिल्हा युवा महोत्सवासाठी परीक्षक म्हणून प्रा. दीपक जमदाडे, प्रा. संतोष मस्के, विलास सोनवणे, प्रा. पांडुरंग सुतार, प्रा. राम गव्हाणे, डॉ. संजय कांबळे, डॉ. संदीप परद-ेशी, प्रा. सुमित गायकवाड, रवी धुताडमल, लक्ष्मीकांत दोडके, जितेंद्र आराक, सुमित गाडे, डॉ. श्रीकांत पुरी, बालासाहेब कांबळे आणि श्रीमती क्षितीजा गव्हाणे यांनी अत्यंत पारदर्शकपणे कर्तव्य पार पाडले. जिल्ह-ास्तरीय युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर आणि जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी. निकाळजे, प्रा.चंद्रशेखर किरवले, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, रेवननाथ शेलार, युवा महोत्सव संयोजक जितेंद्र आराक, धनेश करांडे, तुलसी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद, मयुर पाठक, दिनकर चर्के आदीनी परिश्रम घेतले. हा महोत्सव विद्यार्थी-विद्यार्थींनी, युवक-युवतींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

.....

कृती समिती

वेगाने होईल. यावेळी सिरसाळा कृती समितीचे अध्यक्ष बाळासाहेबजी नाटकर, कार्याध्यक्ष व भाजपा अल्पसंख्याक मोर्चा परळी तालुकाध्यक्ष तोफिक भाई सिद्दीकी, ज्येष्ठ पत्रकार व संपादक मा बाळासाहेबजी कडभाने, सचिव मधुकर अण्णा टेकाळे, उपाध्यक्ष पोलीस पाटील संदीपजी थोरे, सरपंच रमेशजी सर्जेराव, मार्गदर्शक व प्राध्यापक रविकांतजी कराड सर, उपाध्यक्ष किरण कुमार डोंगरे, कृती समिती उपाध्यक्ष मयूरजी मारवाड सोशल मीडिया प्रमुख विजय गायकवाड, अमजद भाई पठाण , मेहबूब भाई पठाण, प्रसिद्धी प्रमुख दैनिक लोकमत चे पत्रकार राजेंद्र पांडे तसेच पत्रकार रफिक भाई पठाण माजी सरपंच वैजनाथ राव कदम, सुरज नाटकर, आदी उपस्थित होते. सिरसाळा कृती समितीने ही मागणी मान्य होईपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे. सिरसाळा व पंचक्रोशीतील नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे.

.....

आशिष दामले

ठरत आहे. खडके कुटुंबीयांना या संकटातून सावरण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या भेटीप्रसंगी गेवराईचे भाजप नेते बाळराजे दादा पवार, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, दीपक रणनवरे, 'परळी संचार'चे संपादक अनंत कुलकर्णी यांच्यासह गेवराई व परळी येथील ब्राह्मण समाजाचे पदाधिकारी, समाजबांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कठीण प्रसंगी पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे राहून त्यांना उपचारासाठी मदतीचा हात देण्याची भूमिका या भेटीतून अधोरेखित झाली.

.....

ॲड.कवठेकर

लाभार्थ्यांना पशुधन व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाच्या नियमानुसार आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन मिळविण्याची संधी उपलब्ध आहे.

योजनेतून ग्रामीण विकासाला मिळणार नवी दिशा!

शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची संधी. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराची संधी. दुग्धव्यवसाय व पशुपालन व्यवसायाला चालना. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन. शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी. मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील सर्व गावांमध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न चालु आहेत. ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या मागे न लागता शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय उभारावा, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण कराव्यात आणि शेतीसोबत पशुपालन व्यवसायालाही प्राधान्य द्यावे. डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील सर्व इच्छुक शेतकरी, युवक, महिला व पशुपालकांनी संबंधित पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधून योजनेची सविस्तर माहिती घ्यावी. पात्रतेनुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज प्रक्रिया पूर्ण करून या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

.....

खुर्शीदआलम

ज्या ज्या विहिरीला आणि बोअर ला भरपुर पाणी आहे त्यामधुन पाइपलाइन द्वारे त्या टाक्या मार्फत पाणी सप्लाय करण्यात यावे. नवीन हापसे घेण्यात यावे, जुने हाफसे दुरुस्त करण्यात यावे, टैंकर वाढवण्यात यावे, लिकेजेसमुळे पाणी वाया जातोय ते लिकेज दुरूस्ती करून घ्यावी, स्वच्छता बाबतीत म्हटले आहे की सफाई कामगार वाढवून घ्यावेत, शहरातील मोठमोठ्ठे नालेंची सफाई करण्यात यावी, ठिकठिकाणी कचर्याचे ढिगारे मुळे आणि तुंबलेल्या गटारीमुळे रोगराई पसरत आहे म्हणून स्वच्छता साठी विशेष उपाययोजना हाती घ्यावे तसेच घंटागाड्या वाढविण्यात यावे, लाईट संदर्भात म्हटले आहे की खंब्यावर चिमण्या सारखे मर्क्युरी पेक्षा मोठ्ठ्या मर्क्युरी बसविण्यात यावेत, बीड शहरातील विविध चौकात तसेच कब्रस्तानात आणि शमशान भूम्यामध्ये हायमास्ट (मर्क्युरी टावर) बसविण्यात यावेत, नियमानुसार दर महिन्याला सर्वसाध-ारण सभा घेण्यात यावी, बोगस बिलं वर अंकुश ठेवावेत, जर दुष्काळ मुळे सिमेंट रस्ते करता येते नसेल तर डांबरी रस्ते करण्यात यावे, ज्या प्रभागामध्ये विकासकामे पूर्ण झाले असेल तर त्या नगरसेवकांची कामे पुर्ण झाल्याचे पत्र घ्यावे किंवा मुख्याधिकारींनी स्वतः पाहाणी केल्या शिवाय बिले देण्यात येऊ नयेत असे व इतर मागण्या बाबतीत चर्चा करून निवेदन देण्यात आले आहे तर मुख्याधिकारी विक्रम मांडूळके यांनी सर्व नगरसेवकांचे ऐकून घेतले आणि आपल्या मागण्यांवर लवकरात लवकर अंमलबजावणी केली जाईल असे आश्वासन दिले आहे. दरम्यान जर वरील मागण्यांवर दुर्लक्ष केले गेले तर सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही सर्व नगरसेवक नागरिकांसह आंदोलन सुरू करू असा इशारा राष्ट्रवादी तुतारी गटाचे गटनेते खुर्शीद आलम, नगरसेवक भारत कांबळे, नगरसेवक शेख अफसर, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक बब्बु भाई, नगरसेवक शुभम धुत, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक माने साहेब, नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक मसी भाई, नगरसेवक नितीन साखरे, नगरसेवक अक्षय जाधव, नगरसेवक मोहसीन भाई, यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

.....

घवघवीत यश!

९) बागवान आकिब सरफराज पुणे १०) शेख अयान युनूस छत्रपती संभाजीनगर, ११) शेख झीशान मुबीन छत्रपती संभाजीनगर, १२) शेख अहसान अरशद छत्रपती संभाजीनगर, १३) अब्दुल रहमान अतीक बी.टेक., बीड १४) उमेर अकील कादरी बी.टेक., १५) मोमीन कफील अब्दुल जलील पनवेल

डिप्लोमा क्षेत्रातही विद्यार्थ्यांची यशस्वी वाटचाल
डिप्लोमा ११ विद्यार्थी

१) शेख माज शकील बीड २) सय्यद उबेद मुजफ्फर बीड ३) शेख अनस अझीम बीड ४) पठाण आमेर अमजद बीड ५) शेख योआन अब्दुल रहीम बीड, ६) शेख इल्हाम जमीर बीड ७) शेख कैफ नजीर ८) शेख मदीहा सिद्दीक बीड ९) शेख रिफा निजाम बीड १०) शेख अल्फिया अबरार बीड ११) अन्सारी अश्मिरा झैनब सरफराज बीड

यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची मेहनत!

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे शाळेचे योग्य शैक्षणिक नियोजन, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता स्पर्धात्मक परीक्षांची तयारी, योग्य शैक्षणिक दिशा आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणा देण्याचे कार्य शाळेमार्फत सातत्याने केले जाते. बीडसारख्या जिल्ह्यातून शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील विविध शहरांसह परदेशातही वैद्यकीय व व्यावसायिक शिक्षणासाठी मजल मारणे ही संस्थेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातही आपल्या ज्ञानाचा आणि कर्तृत्वाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी करावा, अशा शुभेच्छा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

''विद्यार्थ्यांचे यश हीच आमच्या शैक्षणिक कार्याची खरी पावती!''

.....

बालविवाहमुक्त

धारूर; जनता माध्यमिक विद्यालय, धारूर; सरस्वती कन्या प्रशाला, केज; जीवन शिक्षण शैक्षणिक संकुल, केज आणि शारदा इंग्लिश स्कूल, केज या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना बालविवाहाच्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. बालविवाहामुळे बालकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, शिक्षण, स्वातंत्र्य आणि भविष्य धोक्यात येते. त्यामुळे बालविवाह रोखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे सामूहिक कर्तव्य आहे, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यात आली. या उपक्रमात एकूण १ हजार ५३८ विद्यार्थ्यांनी बालविवाहविरोधी शपथ घेत बालविवाहमुक्त समाजनिर्मितीचा संकल्प केला. या उपक्रमात संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवा ग्राम विकास मंडळाचे संतोष रेपे, प्रकाश काळे आणि सुनीता विभुते यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

बालविवाह रोखूया, बालपण जपूया!

बालविवाहमुक्त गाव, बालविवाहमुक्त तालुका आणि बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी शाळा, ग्रामपंचायती, पालक, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आले.

.....

कार्यकारिणीची बैठक

प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बैठकीमध्ये परिषदेच्या मागील कामकाजाचा आढावा, संस्थेच्या

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ — पान नं.३

डॉ. सत्यशीला तौर यांच्या कवडसा कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात

जालना । प्रतिनिधी



जालना तालुक्यातील सावरगाव येथे कवडसा कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा प्राध्यापक बसवराज कोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. डॉ. सत्यशीला तौर-देशमुख यांच्या 'कवडसा' कथासंग्रहातील कथा या त्यांनी पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या ग्रामजीवनातील भयानक दारिद्र्य, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा आणि खुळचट रूढी-परंपरांच्या काळोखातील मूकहुंकार आहेत. हा कथासंग्रह ग्रामीण वास्तवातील माणुसकीचा किरण असल्याचे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक प्रा. बसवराज कोरे यांनी केले.

सावरगाव (ता. जालना) येथे भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद (शाखा जालना) आणि आयडियल ग्रोटेक प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कवडसा' कथासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून मसापचे जालना जिल्हाध्यक्ष रवींद्र तौर, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, डॉ. यशवंत सोनुने, आयडियल प्रोड्युसर कंपनीचे संचालक भगवानराव डोंगरे, डॉ. उमेश मुंढे, प्रा. रंगनाथ खेडेकर, बाळासाहेब तनपुरे आणि विनोद जैतमहल आदी मान्यवर उपस्थित होते.

कथासंग्रहावर भाष्य करताना समीक्षक प्रा. दिलीप बिरुटे म्हणाले की, डॉ. तौर यांच्या कथा जालना जिल्ह्यातील ग्रामीण बोलीभाषेचा लहेजा जपत ग्रामजीवनातील वास्तव रेखाटतात. मांडणी, निवेदन, भाषा आणि कथनपद्धती यामध्ये स्वतःचे वेगळेपण जपणाऱ्या या कथा ग्रामीण कथेला नावीन्य देणाऱ्या आहेत. 'तिफण'कार डॉ. शिवाजी हुसे यांनीही कथासंग्रहावर नेमकेपणाने भाष्य केले. प्रकाशन सोहळ्यानंतर रंगलेल्या कथाकथनाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव उगले यांनी, सूत्रसंचालन डॉ. एकनाथ शिंदे यांनी, तर आभारप्रदर्शन भगवानराव डोंगरे यांनी केले. या सोहळ्यास कवयित्री रत्नमाला मोहिते-जाधव, शिवाजी कायंदे, डॉ. बी. जी. श्रीरामे, डॉ. राहुल अंभोरे, प्रा. बाबासाहेब वाघ, मीरा घोलप, वसंतराव डोंगरे, रितेश देशमुख, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, प्रा. बळिराम लहाणे, शंकरराव डोंगरे, शिवाजी डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने रसिक श्रोते उपस्थित होते.

जालना जिल्ह्यात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणार : प्रकाश आबिटकर

माता व बाल संगोपन रुग्णालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण; आरोग्य संस्थांना निधी व मनुष्यबळाची कमतरता भासू देणार नाही

जालना । प्रतिनिधी

राज्यातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभाग मिशन मोडवर काम करीत आहे. आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना, आरोग्य संस्थांमधील अडचणी आणि सेवांचा आढावा घेत आरोग्य यंत्रणा अधिक गतिमान केली जात आहे. जालना जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना निधी आणि मनुष्यबळाची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. जालना येथील जिल्हा महिला रुग्णालयाच्या माता व बाल संगोपन (एमसीएच) विभागाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास खासदार डॉ. कल्याण काळे, माजी मंत्री अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज, आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, वैद्यकीय अधीक्षक सुदाम गवारे, सहायक संचालक (हिवताप) डॉ. रेखा भंडारी, डॉ. पाटोदेकर आदी उपस्थित होते.

आरोग्य संवाद यात्रेतून नागरिकांशी थेट संवाद साधला जात असून, आरोग्य सेवांबाबत विविध सूचना प्राप्त होत आहेत. या संवादामुळे आरोग्य यंत्रणेतील अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे शक्य होत आहे. आरोग्य विभागाच्या अनेक इमारतींची कामे पूर्ण झाली असून, या सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करून नागरिकांना प्रत्यक्ष लाभ देण्यावर भर दिला जात आहे. जालना येथील कँथलॅब आणि प्रादेशिक मनोरुग्णालयाचे पुढील सहा महिन्यांत



उद्घाटन करण्याचा प्रयत्न असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

महिला व बाल आरोग्य सेवेला प्राधान्य

महिला आणि बालकांच्या आरोग्य सेवेला शासन प्राधान्य देत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांच्या आरोग्य तपासणी व उपचारांची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यात आली आहे. बालकांमधील हृदयविकारांसह विविध आजारांचे निदान करून वेळेत उपचार उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत सारंग गावंडे यांच्यावर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली असून, बालकांना वेळेत उपचार मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालये, आरोग्य केंद्रे आणि इतर आरोग्य संस्था पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील. माता व बाल संगोपन केंद्राला 'राष्ट्रमाता जिजाऊ स्त्री रुग्णालय' असे नाव देण्याची शिफारस मुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

शासकीय रुग्णालयांत मोफत उपचारांची सुविधा

गरिबांसह सर्व नागरिकांनी शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी यावे, अशा दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि केंद्र शासनाच्या आरोग्य योजनांच्या माध्यमातून पात्र रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध होत आहेत. उपचारासाठी रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आरोग्य विभाग कार्यरत असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील आरोग्य विषयक समित्या अधिक कार्यक्षम करण्यात आल्या असून, दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आरोग्य यंत्रणेच्या कामकाजाचा नियमित आढावा घेतला जात आहे. आरोग्य संवाद यात्रेतून आरोग्य संस्थांमधील सुविधा, मनुष्यबळ, औषधसाठा आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांची गुणवत्ता तपासून आवश्यक सुधारणा करण्यात येत असल्याचेही आरोग्य मंत्री श्री. आबीटकर यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यात ५०० खाटांचे प्रसूती रुग्णालय उभारावे : खासदार डॉ. कल्याण काळे

जालना जिल्ह्यात आरोग्य सुविधांच्या विस्तारासाठी सुसज्ज इमारतींसोबत आवश्यक अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांनी शासकीय रुग्णालयांना उपचारासाठी प्रथम पसंती द्यावी, यासाठी आरोग्य सेवांचा दर्जा उंचावला पाहिजे. जिल्ह्यात सुमारे साडेअकरा लाख महिला असून, प्रसूतीसाठी उपलब्ध खाटांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे जिल्ह्यात ५०० खाटांचे प्रसूती रुग्णालय उभारावे तसेच वैद्यकीय महाविद्यालयाचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली.

आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आवश्यक : आमदार अर्जुन खोतकर

राज्यात आरोग्यविषयक पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करून माता व बालकांच्या आरोग्याला प्राधान्य दिले जात आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, मजूर, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांना उच्च दर्जाचे उपचार मोफत मिळणे महत्त्वाचे आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका आणि अन्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत. तसेच जालना शहरातील आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेनेही अधिक लक्ष द्यावे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आरोग्य विभागासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार खोतकर यांनी केली.

जिल्हा स्त्री रुग्णालयाचे 'राष्ट्रमाता जिजाऊ स्त्री रुग्णालय' असे नामकरण करा : अरविंद देशमुख

जालना । प्रतिनिधी

जिल्हा स्त्री रुग्णालयातील माता व बाल आरोग्य कक्षाच्या लोकार्पण सोहळ्यात बोलताना आ. अर्जुनराव खोतकर यांनी मराठा महासंघाच्या या मागणीचे पूर्ण समर्थन केले. जिल्हा स्त्री रुग्णालयाचे नाव राष्ट्रमाता जिजाऊ रुग्णालय करण्याच्या मागणीला आपला पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. जालना येथील रुग्णालयाचे राष्ट्रमाता जिजाऊ असे नामकरण करा अशी मागणी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आरोग्य मंत्री नामदार प्रकाश अबिटकर यांना भेटून केली आहे. मराठा महासंघासह सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जालनेकरांची मागणी आरोग्यमंत्र्याकडे केली आहे ही मागणी अत्यंत रास्त व योग्य आहे. जनतेच्या या भावना मुख्यमंत्री महोदयांपर्यंत पोहोचवून हा नामकरणाचा प्रस्ताव मंजूर करून आणू, अशी ग्वाही यावेळी आरोग्यमंत्र्यांनी दिली आहे.



जालना शहरातील गांधी चमन येथील जिल्हा शासकीय स्त्री रुग्णालयाचे नामकरण राष्ट्रमाता जिजाऊ स्त्री रुग्णालय असे करण्यात यावे, अशी आग्रही मागणी जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखालील मराठा महासंघाच्या शिष्टमंडळाने राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे. जिजाऊ जयंती असलेल्या १२ जानेवारीपूर्वी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा शासकीय स्त्री हे जालना जिल्ह्यातील व परिसरातील हजारो सामान्य, वंचित व कष्टकरी कुटुंबांतील माता-भगिनींसाठी मोठा आधारवड ठरले आहे. प्रसूती, बाळंतपण, लसीकरण, नवजात शिशूंची काळजी आणि महिलांच्या आरोग्याशी निगडित विविध उपचार येथे अविरतपणे मोफत व दर्जेदार दिले जातात. डॉक्टर, परिचारिका व सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निस्वार्थ सेवेमुळे एप्रिल २०२५ मध्ये राज्यातील जिल्हा महिला रुग्णालयांच्या गुणवत्ता मूल्यांकनात या रुग्णालयाने संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ मातृतीर्थ सिंदखेडराजा हे जालना जिल्ह्याच्या लगतच असून देशभरातील लाखो भाविक जालनामार्गे सिंदखेडराजा येथे जातात. माता व नवजात बालकांना जीवनदान देणाऱ्या या पवित्र आरोग्य मंदिराला मातृत्वाचे, संस्कारांचे व स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊंचे नाव देणे अत्यंत सार्थ ठरेल, अशी भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

हे निवेदन देताना मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, सरचिटणीस प्रा. संतोष कराळे, उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, इंजि. शुभम टेकाळे, मंगेश मोरे, श्री. राऊत यांच्यासह मराठा महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांची उपस्थिती होती.

तात्काळ वसूल करा : अक्षय गोरंट्याल

जालना । प्रतिनीधी

शहरी भागात सध्या दुष्काळाची दाहकता कमी असली तरी आगामी फेब्रुवारी महिन्यानंतर खरी कसोटी लागणार आहे. दुष्काळाचा सामना करण्यासाठी सर्वपक्षीय नगरसेवकांनी ढाल बनून लढा द्यावा, असे आवाहन भाजपाचे युवा नेते तथा नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी केले.

जालना शहर महानगर पालिकेच्या काल सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी सभेत बोलतांना ते म्हणाले की, जालना शहरातील पाणी पुरवठा सध्या सुरळीतपणे सुरू असला तरी यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने सर्वत्रच पाणी टंचाई निर्माण झाल्याचे चित्र प्रामुख्याने दिसून येत आहे. त्याचे परिणाम फेब्रुवारी महिन्यानंतर जालना शहरातील पाणी पुरवठ्यावर देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वपक्षीय नगरसेवकांनी दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी सजग राहण्याची आवश्यकता असल्याचे सांगून अंबड नगर पालिकेकडे पाणी पुरवठ्यापोटी ८ ते ९ कोटी रुपये थकले असून सदर थकीत रक्कम वसूल करण्यासाठी जालना मनपाने प्रयत्न करावा अशी अपेक्षा नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केली. याशिवाय रॉ - वाटरवर वीज बिलासाठी मोठा खर्च जालना मनपाला करावा लागत आहे. घानेवाडी येथील संत गाडगेबाबा जलाशय परिसरात उभारण्यात येणाऱ्या सोलार प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण झाल्यास वीज बिलाचा खर्च कमी होण्यास मदत होईल.मात्र दुष्काळी परिस्थिती असल्याने राज्य शासनाने रॉ - वाटरवर होणाऱ्या वीज बिलात सवलत द्यावी अशी विनंती जालना मनपाच्या वतीने करावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. पैठण जवळ असलेल्या एका गावात जालना - जायकवाडी या पाणी पुरवठा योजनेचे चार वॉल उघडुन तेथील ग्रामस्थ दररोज २ ते ३ एमएलडी पाणी बेकायदेशीरपणे घेत असून याला तात्काळ रोख लावण्यासाठी पोलिस पेट्रोलिंग तसेच जालना मनपाचे पथक कार्यान्वित करून संबधित व्यक्तिविरुद्ध पोलिसात गुन्हे दाखल करावेत अशी आग्रही मागणी नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी सभेत केली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक महिन्याचे वेतन देण्याचे आवाहन

राज्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.अशा परिस्थितीत दुष्काळ निवारण करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी पाऊल उचलली आहेत. दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी नगरसेवकांनी देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन करत भाजपाचे युवा नेते तथा नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी आपले स्वतःचे आणि आई नगरसेविका सौ.संगीताताई गोरंटयाल यांचे एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

संतोष दिंडे यांची जालना जिल्हा किसान आघाडीच्या अध्यक्षपदी निवड

जालना । प्रतिनिधी

जालना महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग व्ही. पाष्टे यांनी जालना जिल्ह्याच्या किसान काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी वारफळवाडी (ता. पातूर) येथील संतोष लक्ष्मणराव दिंडे यांची नियुक्ती एका पत्राद्वारे केली आहे. नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबई येथून हे नियुक्तीपत्र देण्यात आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे कार्यकर्ते म्हणून दिंडे यांची ओळख आहे. परतुर पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मणराव दिंडे यांची आचार विचार त्यांनी घालून दिलेले आचारसंहिता त्यांनी उभ्या केलेल्या सामाजिक कार्याला पुढे नेण्याचे दृष्टिकोनातून संतोष दिंडे यांनी कायम जनतेच्या सेवेत आपला वेळ दिला आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर जालना जिल्हा किसान आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे.



जालना जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. यावेळी बोलताना दिंडे म्हणाले, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव, कर्जमाफी, पीकविमा, शेतीला वीज आणि पाणी शेतकऱ्यांच्या उसाला भाव ऊसतोड कामगारांच्या लेकरांचा प्रश्न, जिल्ह्यातील हमाल मापारी कामगारांच्या मुलांचे मुलींचे शैक्षणिक प्रश्न शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये यासाठी जनजागृती या प्रश्नांसाठी मी जिल्हाभरात काम करणार आहे. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेनुसार शेतकऱ्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन. त्यांच्या नियुक्तीबद्दल जालना जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते, शेतकरी बांधव आणि ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्यात किसान काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यासाठी दिंडे प्रयत्नशील राहतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष पाष्टे यांनी व्यक्त केला आहे.

काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, खासदार राहुल गांधी, मा.प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, किसान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखपाल सिंग खैरा जालना जिल्ह्याचे खासदार कल्याणराव काळे, जालना काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी तळागाळात जाऊन काम करणार आहे यापूर्वी करत होतो यापुढे वंचित उपेक्षित घटकासाठी आपण काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

अंबड येथे महात्मा फुले इंग्लिश स्कूलमध्ये बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आयोजन; न्यायाधीशांसह विधिज्ञांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अंबड । ज्ञानेश्वर साळुके

अंबड तालुका विधी सेवा समिती, अंबड यांच्या वतीने महात्मा फुले इंग्लिश स्कूल, अंबड येथे बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती एस. एच. राठी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अंबड आणि श्रीमती आशा गाढेकर (दिघे), मध्यस्थी विधिज्ञ तसेच सेवानिवृत्त शिक्षक येडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बालविवाहाचे दुष्परिणाम, बालविवाह प्रतिबंधक कायदा, मुला-मुलींचे हक्क, शिक्षणाचे महत्त्व तसेच बालविवाह रोखण्यासाठी समाजातील



प्रत्येक घटकाची भूमिका याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथेविरुद्ध जागरूक राहून शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा फुले इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गीताराम मते यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती सोनाली उपाध्ये यांनी केले.

या कार्यक्रमासाठी शिरीन सय्यद, कोषाध्यक्ष, वकील संघ अंबड, स्नेहल पुरी, वकील संघ सदस्य अंबड, सेवानिवृत्त शिक्षक येडे सर, दिगंबर खडके, संतोष पैठणे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेच्या प्राचार्या सविता मते, शबनम सय्यद, साधना शिंदे, अश्विनी जानवे, अश्विनी सातपुते, सायली सावंत, बुशरा हाशमी, वैष्णवी गायकवाड, विशाखा जाधव, कोमल देवडे, कीर्ती भवर आणि शिवराज मते यांची उपस्थिती होती. बालविवाहमुक्त समाजनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

घुंगर्डे हादगाव येथे पाण्याअभावी ऊस जळाला; शेतकरी हवालदिल!

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर यंदा मोठे संकट ओढवले आहे. पाण्याअभावी शेतातील उभा ऊस वाळून जळण्याच्या अवस्थेत आला असून, शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराची मेहनत मातीमोल होताना दिसत आहे. एकीकडे शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने ऊस पिकवला, त्यासाठी पाणी, खते, औषधे आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च केले. मात्र पाण्याअभावी ऊस जळू लागल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. जळालेल्या उसाकडे पाहून शेतकऱ्यांचा जीव कासावीस होत आहे.

अशा परिस्थितीत साखर कारखानदारांनी जळालेल्या उसाला सर्वप्रथम तोड देऊन गाळपासाठी प्राधान्य देणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र लाभार्थी सभासदांच्या उसाला योग्य प्राधान्य मिळते का? मूळ सभासद आणि लाभार्थी सभासद यांच्यात भेदभाव केला जातो का? असे प्रश्न परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून उपस्थित केले जात आहेत.

कारखानदारांनी केवळ सभासदत्वाचा विचार न करता संकटात सापडलेल्या प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्याचा विचार करावा. शेतकऱ्यांच्या घामाला आणि कष्टाला न्याय मिळाला पाहिजे. जळालेला ऊस वेळेत गाळपासाठी नेला नाही, तर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आणि साखर कारखाना व्यवस्थापनाने या गंभीर परिस्थितीकडे तातडीने लक्ष देऊन जळालेल्या उसाला प्राधान्याने तोड देण्याची व्यवस्था करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. शेतकरी जगला तर शेती जगेल, आणि शेती जगली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल!

आरोग्य मंत्री यांचा दानवे यांच्याकडून सत्कार

जालना । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. प्रकाश आबिटकर हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, भाजपा महानगर जालना यांच्या वतीने त्यांचे स्वागत करून भगवद्गीता ग्रंथ व रोपटे भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीभाऊ पठाडे, स्थायी समिती सभापती अशोक आण्णा पांगारकर, विष्णू बापू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, भाजपा सरचिटणीस सुनील पवार, जुना जालना मंडळ अध्यक्ष मोहन राऊत, सुमित सुरडकर, गणेश धायडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय अग्रवाल संमेलनाच्या मराठवाडा विभागातील जालना शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमात डॉक्टर वकील इंजिनिअर सोबत उद्योजकांना पत्रकार संपादक यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दैनिक गोकुळ नीतीचे संपादक अर्पण गोयल यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन पुष्पहारणे त्यांचा आंतरराष्ट्रीय अग्रवाल संमेलनाचे प्रांतीय संस्थापक अध्यक्ष रामचरण अग्रवाल बनस्वाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बिल्ल्यांचा मुद्दा पुढे करून चारा बियाणे रोखण्याचा अधिकार कुणी दिला?

टॅगिंग अपूर्ण असेल तर जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करा; दुष्काळग्रस्त पशुपालकांना वेठीस धरू नका!

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालक आधीच आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध व्हावा, या अपेक्षेने शेतकरी पशुसंवर्धन विभागाकडे चारा बियाण्यांची मागणी करीत आहेत. मात्र जनावरांच्या कानात बिल्ला (ईअर टॅग) असल्याशिवाय चारा बियाणे मिळणार नसल्याचे सांगितले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाने पशुधनाची ओळख आणि नोंदणी करण्यासाठी ईअर टॅगिंगची व्यवस्था केली असताना त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची होती. मग आजही अनेक पशुपालकांच्या जनावरांना बिल्ले नसतील तर त्यामागील कारण काय? संबंधित कर्मचाऱ्यांनी गावोगावी जाऊन टॅगिंग केले होते का? की केवळ कार्यालयीन नोंदीवरच समाधान मानण्यात आले? दुसरीकडे, दुष्काळी परिस्थितीत चारा बियाणे वाटपाचा उद्देश पशुधनासाठी हिरवा चारा उपलब्ध करून देणे हा आहे. अशा वेळी टॅगिंग अपूर्ण असलेल्या जनावरांना तातडीने बिल्ले लावून नोंदणी करण्याची व्यवस्था विभागाने करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना अटी सांगून परत पाठविण्यापेक्षा त्यांची अडचण दूर करण्यासाठी अधिकारी पुढाकार घेणार का, हा खरा प्रश्न आहे.

आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे!

मंठा तालुक्यातील पशुधनाची गावनिहाय संख्या, ईअर टॅगिंग पूर्ण झालेल्या जनावरांची संख्या, अद्याप टॅगिंग न झालेल्या जनावरांची संख्या आणि चारा बियाणे वाटपासाठी लागू असलेल्या अधिकृत निकषांची माहिती सार्वजनिक करावी. तसेच चारा बियाणे घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना बिल्ला नसल्यामुळे परत पाठविण्यात आले असल्यास त्याची चौकशी करावी. विभागाच्या स्तरावर टॅगिंगची कार्यवाही अपूर्ण राहिली असेल तर त्याची जबाबदारी निश्चित करावी.

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी असलेला विभागच अडथळा ठरत असेल तर दाद मागायची कुणाकडे?

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी या प्रकरणात लक्ष घालून मंठा तालुक्यातील चारा बियाणे वाटपाची वस्तुस्थिती तपासावी. दुष्काळग्रस्त पशुपालकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० वरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन

लातूर । प्रतिनिधी
राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम व सर्वसमावेशक करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सन २०२६-२०३१ या कालावधीत 'प्रगती' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी आशियाई विकास बँकेकडून (एडीबी) कर्ज घेण्यास व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने १५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी मिळाली आहे.
लातूर जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रुग्णालयातील खाटांची संख्या वाढवून घेतली जाईल, असा शब्द दिला होता. दिलेला हा शब्द पाळत त्यांनी याबाबत राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून लातूर जिल्हा रुग्णालयाची क्षमता १०० खाटांवरून थेट ३०० खाटांपर्यंत वाढविण्यात आली आहे. या



शासन निर्णयानुसार लातूर येथील १०० वरून ३०० खाटांच्या श्रेणीवर्धित जिल्हा रुग्णालयासाठी २३५ नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत, पूर्वीची २१० पदे अस्तित्वात आहेत. त्यामुळे रुग्णालयाचा एकूण आकृतिबंध ४४५ होणार आहे.
लातूर जिल्हा रुग्णालयाच्या खाटांची संख्या वाढवून श्रेणीवर्धन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आभार मानले आहेत. या निर्णयामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार व अद्ययावत द्वितीय स्तरावरील आरोग्य सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.
लातूर जिल्हा रुग्णालयांचा प्रश्न काही तांत्रिक कारणांमुळे काही वर्षे प्रलंबित होता. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर हा प्रश्न सोडविण्यासाठी नियमित पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला आणि लातूर येथे १०० खाटांच्या रुग्णालयाचे भूमिपूजन झाले होते. या भूमिपूजन कार्यक्रमातच त्यांनी जिल्हा रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविण्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून आता लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी दिली आहे.


चारा पिक लागवड अनुदानात वाढ करा : माजी मंत्री आ. संजय बनसोडे

उदगीर । पाटील मनेश
राज्यातील सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि पशुधनासाठी निर्माण होणारी चाऱ्याची संभाव्य टंचाई लक्षात घेता, व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत चारा पिक लागवडीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करून हेक्टरी १ लाख २१ हजार रुपये अनुदान मंजूर करावे, अशी लेखी मागणी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.
राज्यामध्ये व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत चारा पिक लागवडीसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (च-ऋद्धण) यांच्या अंदाजपत्रकानुसार एकरी १ लाख २१ हजार रुपये अनुदान प्रस्तावित होते. मात्र, शासन निर्णय क्रमांक रोहयो २०२६/प्र.क्र. १२१/रोहयो-१, दि. ६ नोव्हेंबर २०२६ नुसार चारा पिकांच्या प्रकारानुसार हेक्टरी ३५ हजार ते ७६ हजार रुपये इतके अंदाजपत्रक निश्चित करण्यात आले आहे.
शासनाने निश्चित केलेले अनुदान चारा पिकांच्या लागवडीसाठी अपुरे ठरत असल्याने शेतकरी चारा पिकांची लागवड करण्यापासून परावृत्त होण्याची शक्यता आहे. परिणामी, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत चारा पिकांच्या लागवडीचे क्षेत्र कमी होऊन पशुपालकांसमोर जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केली आहे.
शेतकरी चारा पिकांच्या लागवडीकडे आकर्षित व्हावेत, तसेच पशुपालकांना जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध व्हावा, यासाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (च-ऋद्धण) यांच्या अंदाजपत्रकानुसार चारा पिक लागवडीचे अनुदान निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुसार हेक्टरी १ लाख २१ हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी आग्रही मागणी आ.संजय बनसोडे यांनी केली आहे.
दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतीबरोबरच पशुधनाचे संरक्षण करणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. चारा उपलब्धतेअभावी पशुपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून संबंधित विभागाला आवश्यक ते निर्देश द्यावेत, असेही आमदार संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

कृष्णा खोऱ्यातील ७ टीएमसी पाण्यापैकी लातूर जिल्ह्यासाठी २ टीएमसी पाणी आरक्षित करा

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची मागणी; लातूरकरांचे उजनीचे पाणी आणण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार

उदगीर । पाटील मनेश
सन २०१६ मध्ये लातूर जिल्ह्याला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागला होता. शहरासह जिल्ह्यातील नागरिकांची तहान भागविण्यासाठी रेल्वेद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर आली होती. भविष्यात अशा प्रकारची पाणीटंचाईची परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, तसेच जिल्ह्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा आणि शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, यासाठी कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यासाठी उपलब्ध होणाऱ्या ७ टीएमसी पाण्यापैकी किमान २ टीएमसी पाणी लातूर जिल्ह्यासाठी आरक्षित करून उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.
राज्य शासनाच्या माध्यमातून कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यासाठी ७ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. याअंतर्गत २ टीएमसी पाणी कृष्णा खोऱ्यातून उजनी धरणात आणून, तेथून सीना-कोळेगाव धरणमार्गे बोगद्याद्वारे तुळजापूर तालुक्याच्या परिसरातील रामदरा तलावात पोहोचविण्याची योजना प्रस्तावित आहे. या योजनेच्या धर्तीवर लातूर जिल्ह्यालाही कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा लाभ मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी आपल्या लेखी मागणीत नमूद केले आहे. लातूर जिल्ह्याला सातत्याने पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. अनियमित पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि भूजल पातळीत होणारी घट यामुळे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न



अधिक गंभीर बनतो. याचा परिणाम शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवरही होत आहे. त्यामुळे जिल्ह्यासाठी कायमस्वरूपी आणि शाश्वत जलस्रोत उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.
कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यासाठी उपलब्ध होणाऱ्या ७ टीएमसी पाण्यापैकी किमान २ टीएमसी पाणी लातूर जिल्ह्यासाठी आरक्षित केल्यास जिल्ह्याच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल ठरू शकते. यासाठी आवश्यक असलेली तांत्रिक, आर्थिक आणि जलवैज्ञानिक व्यवहार्यता तपासण्यात यावी. तसेच स्वतंत्र पाणी हस्तांतरण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात यावेत, अशीही मागणी त्यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. लातूर जिल्ह्यातील नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होण्याबरोबरच शेतीसाठी सिंचनाची सुविधा निर्माण झाल्यास कृषी क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांना दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि शेतीला शाश्वत पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी कृष्णा खोऱ्यातील पाणी लातूर जिल्ह्याला मिळणे महत्त्वाचे आहे.
लातूरकरांचे उजनीचे पाणी जिल्ह्यात आणण्याचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा. जिल्ह्यातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची गरज आणि शेतकरी बांधवांचे हित लक्षात घेऊन कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यासाठी उपलब्ध होणाऱ्या ७ टीएमसी पाण्यापैकी २ टीएमसी पाणी लातूर जिल्ह्यासाठी आरक्षित करण्यास तांत्रिक मान्यता द्यावी आणि यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, अशी आग्रही विनंती माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. यावेळी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित होते.

युवा महोत्सवात दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाची दिमाखदार कामगिरी

लातूर । प्रतिनिधी
जिल्हा क्रीडा कार्यालय, लातूर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धा दयानंद सभागृहामध्ये नुकत्याच पार पडल्या. यामध्ये काव्यलेखन स्पर्धेत प्रथम तीनही पारितोषिके पटकावत महाविद्यालयाने आपले वर्चस्व सिद्ध केले. यामध्ये प्रथम पारितोषिक नीरज कंदले, द्वितीय पारितोषिक ओंकार राठोड, तर तृतीय पारितोषिक शिवाली इसाके हिने मिळविले. तसेच पथनाट्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक, तर समूह लोकगीत स्पर्धेत तृतीय पारितोषिक



मिळवून महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली.
विशेष म्हणजे, काव्यलेखन स्पर्धेतील प्रथम तीनही पारितोषिकांवर दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले नाव कोरले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष संजय बोरा, शालेय समिती सदस्य बालकिशन बांगड, दिनेश इन्नानी, विशाल अग्रवाल व आशिष अग्रवाल यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ. सुभाष मोरे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सोनाली सास्तुरकर, प्रा. ज्योतिबा बडे व सर्व प्राध्यापकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पोद्दार स्कूलमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर विद्यार्थ्यांचे प्रभावी नाट्य सादरीकरण

लातूर । संतोष सोनवणे
लातूर (कातपूर) येथील पोद्दार स्कूलमध्ये २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन (संविधान दिवस) मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या सकाळच्या प्रार्थना सभेत आयोजित या विशेष कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी आदर, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि राष्ट्रीय कर्तव्यांची भावना रुजविण्यात आली. शाळेच्या प्राचार्या सौ. रम्या तुटिका यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समन्वयक सौ. अमृता राजुरे आणि सौ. ममता शर्मा यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता पाचवीच्या 'चॅलेंजर्स' वर्गातील विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी सूत्रसंचालनाने केली. यावेळी विद्यार्थ्यांनी २६ नोव्हेंबर या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व तसेच भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूलभूत मूल्यांवर प्रकाश टाकणारे विचार मांडले. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन. प्राचार्या सौ. रम्या तुटिका यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आणि शिक्षकांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून देशाप्रती असलेल्या मूलभूत कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची शपथ घेतली.
याशिवाय विद्यार्थ्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित लघुनाटिका सादर केली. भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका तसेच त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास या नाटिकेतून प्रभावीपणे उलगडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयाचे आणि मेहनतीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. एकंदरीत, पोद्दार स्कूलमध्ये आयोजित संविधान दिनाचा हा विशेष कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरला. संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून जबाबदार, जागरूक आणि कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून घडण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

लातूर महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सभापती निवडी जाहीर!

चार प्रभाग समित्यांपैकी काँग्रेसला तीन, भाजपला एका सभापतीपदाची संधी; महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी वंचितच्या अंकिता भडीकर, तर उपसभापतीपदी काँग्रेसच्या तब्बसुम शेख यांची निवड

लातूर । प्रतिनिधी
लातूर शहर महानगरपालिकेच्या राजकीय वर्तुळात महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, महानगरपालिकेच्या चार प्रभाग समित्यांच्या सभापतींसह महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उपसभापती पदांच्या निवडी शुक्रवारी (दि. २७ नोव्हेंबर) विशेष सभेत पार पडल्या. जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. या निवडीत चार प्रभाग समित्यांपैकी तीन सभापतीपदे काँग्रेसच्या वाट्याला आली, तर एका सभापतीपदावर भाजपने बाजी मारली. विशेष म्हणजे महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी वंचित बहुजन आघाडीच्या अंकिता भडीकर यांची, तर उपसभापतीपदी काँग्रेसच्या तब्बसुम शेख यांची निवड झाली. त्यामुळे महानगरपालिकेतील राजकीय समीकरणांची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.
लातूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अ, ब, क आणि ड अशा चार प्रभाग समित्या कार्यरत आहेत. या समित्यांच्या सभापती निवडीकडे नगरसेवकांसह शहरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. अखेर विशेष सभेत निवड प्रक्रिया पूर्ण होऊन सर्व पदाधिकाऱ्यांच्या नावांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

चार प्रभाग समित्यांचे नवनिर्वाचित सभापती

१) प्रभाग समिती 'अ' - डॉ. बालाजी साळुंके : प्रभाग समिती 'अ'च्या सभापतीपदी डॉ. बालाजी विठ्ठलराव साळुंके यांची निवड करण्यात आली. त्यांच्या उमेदवारीला कमल सोमवंशी यांनी सूचक म्हणून, तर पवन सोलंकर यांनी अनुमोदन दिले. २) प्रभाग समिती 'ब' - विनय जाकते : प्रभाग समिती 'ब'च्या सभापतीपदी भाजपचे विनय हनमंत जाकते यांची निवड झाली. त्यांच्या नावाला ड. दीपक मठपती यांनी सूचक म्हणून, तर आदिती पाटील यांनी अनुमोदन दिले. ३) प्रभाग समिती 'क' - विकास कांबळे : प्रभाग समिती 'क'च्या सभापतीपदी विकास सतीश कांबळे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या उमेदवारीला मंगेश



सोनकांबळे यांनी सूचक म्हणून, तर विजयकुमार साबदे यांनी अनुमोदन दिले. ४) प्रभाग समिती 'ड' - इसरार सगरे : प्रभाग समिती 'ड'च्या सभापतीपदी इसरार जब्बार सगरे यांची निवड झाली. त्यांच्या नावाला ड. स्नेहल उटगे यांनी सूचक म्हणून, तर आतिश चिकटे यांनी अनुमोदन दिले.

महिला व बालकल्याण समितीवर वंचित-काँग्रेसला संधी

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी वंचित बहुजन आघाडीच्या अंकिता प्रशांत भडीकर यांची निवड करण्यात आली. त्यांच्या नावाला श्रावणी झिपरे यांनी सूचक म्हणून, तर मंजुळा अग्रवाल यांनी अनुमोदन दिले. त्याचप्रमाणे समितीच्या उपसभापतीपदी काँग्रेसच्या तब्बसुम मुख्तार शेख यांची निवड झाली. त्यांच्या नावाला गौरबी बागवान यांनी सूचक म्हणून, तर कांचन अजनीकर यांनी अनुमोदन दिले. या निवडीमुळे महिला व बालकल्याण समितीच्या नेतृत्वाची जबाबदारी आता वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसच्या प्रतिनिधींकडे आली आहे.

महापौर, उपमहापौरांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार

निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व नवनिर्वाचित सभापती व उपसभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यानंतर महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर ड. स्नेहल उटगे आणि स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी आपल्या दालनात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. निवड जाहीर होताच महानगरपालिका परिसरात समर्थकांनी जल्लोष केला. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणाबाजीने परिसर दुमदुमून गेला. नवनिर्वाचित सभापतींचे कार्यकर्त्यांनी उत्साहात स्वागत केले. या निवड प्रक्रियेस जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, नगरसचिव अश्विनी देवडे, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती तसेच विविध राजकीय पक्षांचे नगरसेवक आणि महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

प्रभागांच्या विकासकामांना मिळणार गती?

महानगरपालिकेच्या कारभारात प्रभाग समित्यांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रभागातील नागरी सुविधांचे नियोजन, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे, आरोग्यविषयक सुविधा आणि इतर मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीत या समित्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. त्यामुळे नवनिर्वाचित सभापतींसमोर आपल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यांचे प्राधान्याने निराकरण करण्याचे आव्हान असणार आहे.
दुसरीकडे, महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण, बालकांचे आरोग्य, शिक्षण, पोषण, महिला व बालकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नवनिर्वाचित सभापती व उपसभापतींवर राहणार आहे. एकूणच, महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या निवडीमुळे शहरातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. आता नवनिर्वाचित पदाधिकारी आपल्या पदाचा उपयोग शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी कितपत प्रभावीपणे करतात, याकडे लातूरकरांचे लक्ष लागले आहे.

त्याग आणि समर्पणाचे प्रतीक कै.अशोकराव पाटील एकंबेकर : प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे



उदगीर । पाटील मनेश
छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात कै. अशोकराव पाटील एकंबेकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे होते. तर विचार मंचावर ग्रंथपाल डॉ. विष्णू पवार, प्रबंधक बी.के. पाटील व कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. राम गिरी यांची उपस्थिती होती. यावेळी कै. अशोकराव पाटील एकंबेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कै. एकंबेकर यांच्या विषयी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, त्यांनी किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कायम त्यांच्या गुणवतेविषयी, दर्जासंबंधी भूमिका घेतली. त्यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात संस्थेचे युनिट उत्तमरीत्या चालविले. यामुळे ते त्याग आणि समर्पणाचे प्रतीक होते असे विचार या प्रसंगी मांडले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. सुरेश शिंदे यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला.

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार यांची सब्बनवार प्रशाळेस सदिच्छा भेट; संस्थेतर्फे सत्कार

कुंडलवाडी । प्रतिनिधी



कै.गं.पो.सब्बनवार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुंडलवाडी येथे नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे शाळेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कुसुमताई सब्बनवार व संस्था सचिव तथा विद्यमान नगरसेवक डॉ. प्रशांत सब्बनवार यांच्या हस्ते गजानन कोटलावार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक मारोती कोटलावार व नगरसेवक श्रीनिवास गोणेलवार यांचाही संस्थेतर्फे व शाळेतर्फे सत्कार करून सन्मान करण्यात आला.

या सदिच्छा भेटीदरम्यान शाळेच्या शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांचे यश, सामाजिक उपक्रम, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. शाळेच्या पुढील विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मान्यवरांनी दिले. यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ चटलूरे, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी दिलेल्या सदिच्छा भेटीबद्दल संस्थेच्या व शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

कुंडलवाडी बाजार समितीकडे शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

संचालक मंडळाचे प्रयत्न फेल; मोढ्यात सुकसुकाट, बाजार समिती नावालाच

कुंडलवाडी । प्रतिनिधी

एकेकाळी महाराष्ट्रात नावाजलेली कृषी उत्पन्न बाजार समितीची आज घडीला बकाल अवस्था झाली आहे. सुविधांचा अभाव, शेतीपिकांची आवक नाही, मोढ्यात व्यापारी दुकाने नावालाच, कर्मचाऱ्यांचे पगार नाही. पगार मिळत नसल्याने कर्मचारी कर्तव्यावर नाही. फक्त सचिव, सेवक कर्तव्यावर मात्र कार्यालय बंदच. संचालक मंडळाच्या आवाहनाला शेतकऱ्यांनी पाठ दाखवली. कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना २१ फेब्रुवारी १९५१ साली झाली. मागील काळात माजी आमदार विकास पुरुष कै. जयरामजी अंबेकर, कै. के. रामलू, कै. बाबाराव एंबडवार, कै. सयाराम सब्बनवार, कै.डॉ. बाबाराव भाले, गंगाधरराव भिंगे, कै. दत्तराम बोधने, व्यंकटराव पाटील गुजरीकर आदी सभापती, उपसभापती संचालक मंडळांच्या कार्यकाळात समितीला नावलौकिक प्राप्त झाली होता.



नायगाव, धर्माबाद तालुके घोषित झाले आणि २० जून २००० ला बाजार समितीचे विभाजन होऊन बिलोली येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची निर्मिती झाली. २००८ मध्ये निवडणूक पार पडली, त्यानंतर प्रशासक राज तब्बल ११ वर्षानंतर २०२३ ला निवडणुका पार पडल्या. बाबाराव भाले यांचे संगमेश्वर पॅनलला बहुमत मिळाले. सभापती पदी बाबाराव भाले विराजमान झाले, मागील काळात सुद्धा बाबाराव भाले सभापती होते. त्याचा तो काळ त्यांनी यशस्वीरीत्या पुर्ण केले. बाजार समितीला पुर्णता रंगरंगोटी केले. शेतक-यांसाठी यार्डात टाकी उभारणी पिण्याचा पाण्याची सोय केले.कर्मचा-यांचे काही प्रमाणात थकीत पगार काढण्यात त्यांच्या प्रयत्नाने यश आले होते. परंतू सद्या पण ते विद्यमान सभापती आहे. मात्र मागील तीन वर्षापासून समितीला घरघर लागली. विद्यमान चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालकांनी निवडणुकीत अनेक आश्वासने दिली. बाजार समितीचा चेहरामोहरा बदलण्यात येईल, मागील दिवस परत आणण्यात येतील. मात्र सर्व आश्वासने वाऱ्यात उडाली. सध्या बाजार समितीला कोणी वालीच नाही. मोढ्यात शेतीपिकाच्या एका दाण्याची सुद्धा आवक नाही. बाजार समिती मोढा अवैध धंदेवाल्यांचा अड्डा बनला, दारूडे दारूपऊन हौदोस मासजित आहे. जुगार पण घेण्यात येत आहे. धंदेवाले अवैध रेती, मुरूम साठविण्याचा अड्डा बनला आहे. हक्काची जागा अतिक्रमणाच्या विळख्यात आहे. अंतर्गत रस्त्याची दुर्दशा झाली. सध्या सचिव व एक सेवक कर्तव्यावर असून त्यांचे पण पगार वेळेवर होत नाही. शेतकरी यार्डात शेतीमाल आणण्यास तयार नसल्याने व्यापाऱ्यांनी इतरत्र व्यापार सुरू केले. शासनाच्या खुल्या व्यापारी धोरणाने व मोढ्यात मूलभूत सोयीसुविधांच्या अभावाने शेतकरी आपला शेतीमाल इतरत्र विकत आहे. पूर्वी व्यापारी गावापर्यंत पोहचत नसे, आज व्यापारी बांधावर जाऊन माल खरेदी करीत आहे. यामुळे बाजार समितीचे उत्पन्न घटले.

निवडणुका जाहीर झाल्या की विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी निवडणूक प्रतिष्ठेची करतात. पण याचा सामान्य शेतकऱ्यांना काहीच फायदा होत नाही. कार्यरत संचालक मंडळ गतवैभव पुन्हा प्राप्त करून देतील, अशी ग्वाही निवडणुकीत दिली होती. त्यांचे आश्वासन हवेतच उडून गेले, असे पण शेतकरी नागरीक बोलून दाखवत आहे.

कापसी बु येथे २९ नोव्हेंबरला राजकीय दिग्गजांची मांदियाळी!

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते श्री बालाजी स्टोन क्रेशर, RMC व HOT मिक्स प्लांटचे भव्य उद्घाटन; आ. चिखलीकर अध्यक्षस्थानी

नांदेड । प्रतिनिधी

लोहा तालुक्यातील कापसी बु येथे उभारण्यात आलेल्या श्री बालाजी स्टोन क्रेशर, ठचउ प्लांट आणि कजढ मिक्स प्लांटचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते या तिन्ही प्रकल्पांचे उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर उपस्थित राहणार आहेत. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने कापसी बु येथे राजकीय, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मांदियाळी जमणार आहे. हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे उपनेते हेमंत पाटील, कळमनुरीचे आमदार संतोष बांगर, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. गंगाखेड पंचायत समितीचे माजी सभापती तथा भाजपाचे माजी परभणी जिल्हाध्यक्ष श्रीराम मुंडे यांचे चिरंजीव बालाजी श्रीराम मुंडे यांनी कापसी बु येथे हे तीनही प्रकल्प उभारले आहेत. त्यांच्या या नव्या औद्योगिक उपक्रमाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यास माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे, डॉ. मधुसूदन केंद्रे, मोहन अण्णा हंबर्डे, ओमप्रकाश पोकर्णा, अविनाश घाटे, सुभाष साबणे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, प्रणिता देवरे चिखलीकर, माधव पावडे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष संतोषभाऊ मुरकुटे, विठ्ठल रबदडे मामा, गुरुद्वारा बोर्डाचे सचिव रविंद्रसिंग बुंगई, ॲड. व्यंकटराव तांदळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.याशिवाय मनोहर महाराज केंद्रे, बालाजी पाटील मारतळेकर, आनंदराव पाटील ढाकणीकर, डॉ. सचिन उमरेकर, गणेश सावळे, बालाजी बच्चेवार, सुभाष गायकवाड, सचिन पाटील चिखलीकर, गणेश उबाळे, केरबा पाटील वडवळे, माणिकराव मुकदम, शंकरराव ढगे, नारायणसिंग तबेलेवाले, रमेशराव सानप, धनराज गुट्टे, गोपाळ मुंडे, शाम धुत आणि सुशीलकुमार सिसोदिया यांचीही उपस्थिती राहणार आहे.

संगीताचीही रंगणार मेजवानी!

उद्घाटन सोहळ्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध गायक प्रमोद सरकटे यांचा 'स्वरराज' गीत-संगीत कार्यक्रम. या संगीत मैफलीमुळे उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक रंगत लाभणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कापसी बु येथील ग्रामस्थ गेल्या आठ दिवसांपासून विशेष मेहनत घेत आहेत. या भव्य उद्घाटन सोहळ्यास कापसी बु तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी सभापती श्रीराम मुंडे, बालाजी मुंडे, रवी सानप आणि सुशील मुंडे यांनी केले आहे.

ॲड.विष्णु गोडबोले यांची अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती

नांदेड । प्रतिनिधी



नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळीत आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते तथा विधिज्ञ ॲड. विष्णुजी नारायण गोडबोले यांची भारत सरकार नोंदणीकृत अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समिती ही राज्यव्यापी स्तरावर कलावंतांच्या न्याय्य हक्कांसाठी कार्यरत असलेली संघटना आहे. कलावंत, साहित्यिक, वारकरी आणि सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तींच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे, तसेच कलावंतांना योग्य सन्मान आणि न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. ॲड.विष्णुजी नारायण गोडबोले यांनी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात ज्येष्ठ नेतृत्व म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक चळवळींशी असलेली त्यांची बांधिलकी, समाजहितासाठीचा पुढाकार आणि जनसामान्यांच्या प्रश्नांबाबतची तळमळ लक्षात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील कलावंतांच्या न्याय हक्कांसाठी संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि सामाजिक कार्याचा लाभ संघटनेला मिळणार असून, राज्यातील कलावंत, साहित्यिक व वारकरी बांधवांच्या प्रश्नांना संघटनात्मक बळ मिळेल, असा विश्वासही व्यक्त होत आहे. या नियुक्तीबद्दल महाराष्ट्रातील तमाम कलावंत, साहित्यिक, वारकरी तसेच अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीचे सर्व सभासद, प्रमुख पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या वतीने ड.विष्णुजी नारायण गोडबोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

भोकरच्या सायाळ शिवारात हळदीच्या पिकात गांजाची लागवड; लिंबगाव पोलिसांची कारवाई

भोकर । एजास कुरेशी

हळदीच्या पिकात आंतरपीक म्हणून गांजाची अवैध लागवड करणाऱ्या एका शेतकऱ्यावर लिंबगाव पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. सायाळ शिवारात टाकलेल्या या छाप्यात पोलिसांनी तब्बल १२ किलो ६९५ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे जप्त केली असून, या मुद्देमालाची बाजारभावानुसार किंमत ६ लाख ३४ हजार ७५० रुपये इतकी आहे. याप्रकरणी ६५ वर्षीय शेतकऱ्याविरुद्ध एनडीपीएस (छऊझड) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मोहिमेअंतर्गत लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही धडक कारवाई पार पडली. २६ नोव्हेंबर रोजी लिंबगाव पोलिसांचे पथक अवैध धंद्याविरोधात गस्त घालत असताना, सायाळ शिवारातील एका शेतात गांजाची लागवड करण्यात आल्याची खात्रीलायक गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेण्यात आली. त्यानंतर राजपत्रित अधिकारी, दोन शासकीय पंच, फॉरेन्सिक सायन्स टीम, वजन-मापे तज्ज्ञ आणि छायाचित्रकार यांच्या पथकासह सायाळ शिवारातील शेत गट क्रमांक २५९ मध्ये छापा टाकण्यात आला.

या तपासणीदरम्यान शेतातील हळदीच्या ओळींमधील सरीत गांजाची झाडे वाढवलेली आढळून आली. पोलिसांनी शेतात उपस्थित असलेले शेतकरी गोविंद किशनराव घुमाळ (वय ६५, व्यवसाय शेती, रा. सायाळ, ता. जि. नांदेड) यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली. संबंधित शेत आपण स्वतः कसत असून, त्यामध्ये गांजाची लागवड केल्याची कबुली त्यांनी दिल्याचे पोलिसांनी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून १२ किलो ६९५ ग्रॅम वजनाची गांजाची वनस्पती जप्त केली असून, पोलीस उपनिरीक्षक निजाम मुसा सदर यांच्या फिर्यादीवरून लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव व अर्चना पाटील तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक व्यंकट पोकले, पोलीस अंमलदार मांडवकर, मार्कुरवार, अतुल सातारे, प्रमोद मोरे, बालाजी तेलंग, व्यंकट जाधव, रतेश टाक, दीपक गदनमारे, मारोती दासरवाड आणि महिला पोलीस अंमलदार नेहल भाजीपाले यांनी सहभाग घेतला. जिल्ह्यात अमली पदार्थांची लागवड, विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा कडक इशारा जिल्हा पोलीस दलातर्फे देण्यात आला आहे.

४०० वर्षांच्या इतिहासाचा साक्षीदार – बिलोलीच्या ऐतिहासिक जामा मशिदीला पोलीस अधीक्षकांची भेट

मुतवल्ली शौकत बेग यांच्यातर्फे फारसी दस्तऐवजांचे दर्शन, मराठी अनुवादित दिव्य कुराण भेट

कुंडलवाडी । मोहम्मद अफजल



नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी दि.२५ नोव्हेंबर रोजी बिलोली तालुक्याच्या नियोजित दौऱ्या दरम्यान बिलोली शहरातील ऐतिहासिक सरफराज खान जामा मशिदीला सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे बिलोलीच्या ४०० वर्षांच्या ऐतिहासिक वारशाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला. मशिदीचे मुतवल्ली तथा सरफराज खान यांच्या १४ व्या पिढीचे वंशज शौकत बेग यांनी पोलीस अधीक्षकांचे स्वागत केले. त्यांनी अधीक्षकांना मशिदीचा इतिहास, बांधकाम शैली आणि जतन केलेले प्राचीन दस्तऐवज याबद्दल सविस्तर माहिती दिली.

बिलोली येथील ही जामा मशीद सुमारे १६४५ मध्ये मोगल राजे शाहजहान यांचे सेनापती सरफराज खान यांच्या देखरेखीखाली बांधण्यात आली. दगडावरील अप्रतिम कोरीव काम, भव्य घुमट आणि तत्कालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ही मशीद आजही ओळखली जाते. तब्बल चार शतके उलटूनही ही वास्तू आपल्या मूळ वैभवात उभी आहे. यावेळी शौकत बेग यांनी अधीक्षकांना ४०० वर्षांपूर्वीचे सुवर्ण मुद्रित फारसी लिपीतील दुर्मिळ दस्तऐवज दाखविले. त्या दस्तऐवजांमधून मशिदीचा इतिहास, तत्कालीन व्यवस्था आणि सरफराज खान घराण्याची परंपरा उलगडते. अधीक्षकांनी हे दस्तऐवज बारकाईने पाहून त्याविषयी उत्सुकतेने माहिती घेतली.

या प्रसंगी शौकत बेग यांच्या वतीने पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांना मराठी अनुवादित दिव्य कुराण भेट म्हणून देण्यात आले. ही भेट म्हणजे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आणि परस्पर आदराचे प्रतीक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर, बिलोली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे, मुतवल्ली शौकत बेग, अजीज बेग, खदीर बेग, मंसुर बेग ईनामदार, नगरसेवक वसीम बेग ईनामदार यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस अधीक्षकांनी मशिदीची पाहणी करून समाधान व्यक्त केले व ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

बन्सी गायसमुद्रे यांना माजी पंतप्रधान 'अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय सन्मान-२०२६' जाहीर

लोहा । अशोक सोनकांबळे



मराठवाड्यातील सुप्रसिद्ध प्रशासक तथा महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराचे मानकरी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते समाजसेवक बन्सी भिवाजी गायसमुद्रे यांना त्यांच्या सामाजिक कार्याची व समाजाप्रती असलेल्या योगदानाची दखल घेत प्रतिष्ठेचा माजी पंतप्रधान 'अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय सन्मान-२०२६' प्रदान करण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्यासाठी त्यांना उद्भव फाउंडेशनच्या वतीने सन्माननीय व्यक्तिमत्त्व म्हणून विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. भारताचे माजी पंतप्रधान व ज्येष्ठ साहित्यिक स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करण्यासाठी उद्भव फाउंडेशन या सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक संस्थेच्या वतीने रविवार, दि.२९ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्ली येथील हॉटेल हॉलिडे इन, मयूर विहार येथे सकाळी १०.३० वाजता या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाज आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच दिल्ली सरकारचे माजी उपशिक्षण संचालक डॉ. अरुण प्रकाश ढौंडियाल यांच्या पुस्तकाचे लोकार्पणही यावेळी होणार आहे.

उद्भव फाउंडेशनचे अध्यक्ष, ज्येष्ठ कवी-साहित्यकार व शिक्षणतज्ज्ञ डॉ. विवेक गौतम यांनी बंसी भिवाजी गायसमुद्रे यांना लेखी निमंत्रण पाठवून या राष्ट्रीय सन्मान सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. गायसमुद्रे यांना राष्ट्रीय स्तरावरील सन्मानासाठी निमंत्रित करण्यात आल्याने मराठवाड्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दगड सांगवी व वागदरवाडी रस्त्यावरील पुलाच्या कामाचे प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न!

ग्रामीण भागाच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध : चिखलीकर

लोहा । अशोक सोनकांबळे



दगड सांगवी व वागदरवाडी रस्त्यावरील पुलाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा युवा नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या पुलामुळे दगड सांगवी, उंब्रजसह परिसरातील गावांचा दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून, विशेषतः पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर उपस्थित होते. दगड सांगवीकर आणि चिखलीकर कुटुंबाचे नाते जिव्हाळ्याचे व विश्वासाचे असून, ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि मूलभूत सुविधांच्या विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

या सोहळ्यास पंचायत समिती उपसभापती रोहित पाटील आंडगेकर, माजी जि.प. सदस्य चंद्रमुणी मस्के, माजी पंचायत समिती सदस्य प्रल्हाद पाटील फाजगे. सार्वजनिक बांधकाम विभाग लोहाचे उप अभियंता सुमित पाटील, कनिष्ठ अभियंता श्रीकांत गुंडावार, चोंडीचे सरपंच संतोष जाधव पाटील, मजरा सरपंच राम पाटील शिरसाट, कदमवाडीचे सरपंच राघोबा कदम पाटील, दगड सांगवीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग पाटील फाजगे, माजी सरपंच सुर्यकांत पाटील फाजगे, शिल्पकार तुळशीराम पाटील मोरतळे, मुख्याध्यापक गोविंदराव फाजगे, प्रा. कृष्णा फाजगे, संजय फाजगे, पोलीस पाटील मुरलीधर फाजगे, माजी सरपंच उत्तम फाजगे, शामराव पाटील, सदाशिव फाजगे, पंडितराव फाजगे, बालाजीराव मोरतळे, माधवराव मोरतळे, पत्रकार राजू फाजगे, छावा संघटनेचे संतोष फाजगे, रमेश फाजगे, मंगेश फाजगे, मनोज फाजगे, मुंजाजी हाके, भिमराव आडकुटे, देवकाते, ग्रामसेवक जाधव, तलाठी गाडे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय फाजगे, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार श्रीराम फाजगे सर यांनी केले. या पुलाच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, ग्रामीण विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

संविधानिक मूल्यांच्या जतनासाठी प्रत्येकाने कटिबद्ध राहावे!

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचे प्रतिपादन; मुदखेडमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा, २६/११ च्या शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली

मुदखेड । अतीख अहमद





भारतीय संविधान हे आपल्या लोकशाहीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रमुख आधारस्तंभ आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही संविधानाची जीवनदायी मुळे आहेत. प्रत्येकाने संविधानाप्रमाणे आचरण करावे. संविधानाने दिलेले अधिकार अबाधित राखण्यासाठी आपण कटिबद्ध असून भारतीय संविधानाच्या मूल्यांचे संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी शहरातील शासकीय विश्रामगृहात अ.भा.मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न मुदखेड तालुका पत्रकार संघ, लोकजागृती प्रतिष्ठान चिलपिंपरी व आचार्य बाळशास्त्री जांभेकर से.स. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिन व २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रमात बोलतांना केले.

प्रारंभी, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले व शासकीय विश्रामगृहात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यानिमित्ताने केंद्रीय राखीव पोलीस दलाचे सहाय्यक कमांडन्ट करणजित सिंग, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राहुल कोकणे, हेड कॉन्स्टेबल अघोने रावण, बेलदार सोमनाथ, अतुल दाभाडे यांच्यासह अन्य 'सीआरपीएफ' जवानांची विशेष उपस्थिती होती. गेल्या अनेक वर्षांपासून मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने संविधान दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात येतो. यावेळी नगराध्यक्षा सौ.विश्रांतीताई माधव पा.कदम, सामाजिक कार्यकर्ते ड.विष्णू गोडबोले, मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे, विश्वनाथ चंदलवाड, नगरसेवक अविनाश चौदंते, ऋषिकेश पारवेकर, संजय बोकेफोड, उद्योजक शिवानंद देवके, बालासाहेब देशमुख चिकाळेकर, बंडू भंडारे, पो.हे.कॉ.किशोर पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय कोलते यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद केली. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा सामाजिक कार्यकर्ते ड.विष्णू गोडबोले यांनी केले.

दरम्यान, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.वृषाली येमेकर, नगराध्यक्षा प्रतिनिधी माधव पा.कदम, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय शिप्परकर, काँग्रेस प्रवक्ते बालाजी पा.गाढे, ज्येष्ठ पत्रकार शेख अजगर हुसेन यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय कोलते, जिल्हा सहसचिव ईश्वर पिन्नलवार, तालुकाध्यक्ष दिनेश शर्मा, सचिव संतोष सावंत, प्रल्हाद मस्के, नामदेव राहेरे, शेख जब्बार, रुखमाजी शिंदे, मनोज कमटे, शेख शमशोद्दीन, उपाध्यक्ष शेख इरफान, मोहम्मद हकीम, अमोल टेकले, सचिन चंद्रे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी तर आभार ज्येष्ठ पत्रकार अजगर हुसेन यांनी मानले.

जिल्हा युवा महोत्सव कार्यक्रम संपन्न

जाती-धर्माच्या भिंती बाजूला ठेवून बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड/जिमाका

केवळ शालेय गुणांवर प्रगती अवलंबून नसते, तर तुम्ही कशावर लक्ष केंद्रित करता यावर तुमचे यश विसंबून असते. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात कला व क्रीडा प्रकारात नेहमी सहभाग नोंदविणे गरजेचे असते. स्पर्धेत पहिला किंवा दुसरा क्रमांक मिळविण्यापेक्षा तुमचे सादरीकरण अत्यंत महत्त्वाचे असते. तरी जिल्ह्यातील युवकांनी जाती-धर्माच्या भिंती बाजूला सारून सामाजिक दायित्वाच्या भावनेतून बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६-२७ चे आयोजन बीड येथील तुलसी महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले होते. यावेळी तुलसी शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा.दिनकर थोरात, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारार्थी डॉ.कविता गिते, राष्ट्रीय खेळाडू श्रीमती क्षितीजा गव्हाणे,



प्राचार्य डी.जी. निकाळजे आदिची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, युवकांना योग्य दिशा दाखविण्याची आज नितांत गरज आहे. जिथे तरुणांशी संवाद साधण्याची संधी मिळते, तिथे मी माझ्या व्यस्त बैठका व कार्यक्रमातून वेळात वेळ काढून आवर्जून जातो. विशेषतः जलसंधारण आणि क्रीडा विभागाच्या उपक्रमांना मी नेहमीच प्राधान्य देतो. कला आणि क्रीडा हे आपल्या अत्यंत आवडीचे विषय असल्याचे नमूद करत ते पुढे म्हणाले, मी माझ्या व्यस्त जीवनशैलीतून वेळ काढून आजही नियमित खेळ खेळतो. तरुणांनीही जबाबदारीने वर्तन करून आपले गाव आणि शहराच्या प्रगतीसाठी हातभार लावावा. या युवा महोत्सवाच्या माध्यमातून बीडच्या तरुणांनी आपले कौशल्य सिद्ध करून विभाग आणि राज्यस्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे. असेही त्यांनी सांगितले.

छत्तीसगड येथील रायपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या वंदे मातरम या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात बीड जिल्ह्याच्या युवकांनी महाराष्ट्र राज्याचे आणि बीड जिल्ह्याचे अत्यंत प्रभावी व भरभक्कम प्रतिनिधित्व केले आहे. सांस्कृतिक, बहुभाषिक आणि सामाजिक विषयावर दिलेल्या उत्कृष्ट (पान २ वर)

कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या



सिरसाळा/प्रतिनिधी

पोहनेर येथील प्रभाकर मुक्ताराम काकडे (वय ५९) यांनी त्यांच्या शेतात झाडाला प्रभाकर काकडे यांनी कर्जबाजारी होते त्यामुळे त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २६ नोव्हेंबर दुपारी उघडकीस आली. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मृतदेह शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. तपास सहायक पोलिस निरीक्षक बाबा राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार आशिष शेंगोळे करत आहेत. प्रभाकर काकडे यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. त्यांच्या पश्चात कुटुंबात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे.

सिरसाळ्यात स्टेट बँकेची शाखा सुरू करण्यासाठी कृती समितीची जोरदार मागणी

माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्याकडून मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र

सिरसाळा/प्रतिनिधी

सिरसाळा हे परळी वैजनाथ तालुक्यातील एक महत्त्वाचे व प्रमुख बाजारपेठेचे केंद्र आहे. परिसरातील अनेक गावांतील नागरिकांचा दैनंदिन व्यवहार सिरसाळा येथे होत असतो. येथे व्यापारी, शेतकरी, छोटे व्यावसायिक, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी संख्या आहे.

मात्र, सिरसाळा येथे भारतीय स्टेट बँकेची स्वतंत्र शाखा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना बँकेशी संबंधित आर्थिक व्यवहार, शासकीय योजनांचे लाभ, शेतीविषयक आर्थिक व्यवहार, कर्जप्रकरणे, पैसे जमा करणे व काढणे आदी कामांसाठी परळी वैजनाथ येथे जावे लागते. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात वाया जात आहे. वृद्ध, महिला, शेतकऱ्यांना तर याचा सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत आहे.



सिरसाळा परिसरातील वाढती लोकसंख्या, व्यापारी उलाढाल आणि बँकिंग सेवांची वाढती गरज लक्षात घेता येथे भारतीय स्टेट बँकेची एस बी आय ची नवीन शाखा सुरू होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सिरसाळा कृती समितीने सातत्याने पाठपुरावा सुरू केला आहे. याच मागणीसाठी माजी खासदार डॉ. प्रितमताई गोपीनाथ मुंडे साहेब यांनी राज्याचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांना दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी पत्र दिले आहे. या पत्रात त्यांनी सिरसाळा येथे भारतीय स्टेट बँकेची नवीन शाखा सुरू करण्यासाठी संबंधित बँक प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्वेक्षण करून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत योग्य ते सहकार्य करावे, अशी विनंती केली आहे.

या मागणीमुळे सिरसाळा परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जर सिरसाळ्यात स्टेट बँकेची शाखा सुरू झाली तर शेतकऱ्यांना पीक कर्ज, शासकीय अनुदान, व्यापाऱ्यांना व्यवहार, विद्यार्थ्यांना शिक्षण कर्ज, महिलांना बचत गटाचे व्यवहार हे सर्व एकाच ठिकाणी, गावातच मिळतील. परिसराचा आर्थिक विकासही (पान २ वर)

खडके कुटुंबीयांची कॅप्टन आशिष दामले यांनी घेतली भेट; उपचारांसाठी मदतीचा दिला शब्द

गेवराईतील हल्ल्यात जखमींची विचारपूस; कठीण प्रसंगी कुटुंबाला सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही

गेवराई/प्रतिनिधी

गेवराई येथे सुनीलराव खडके यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री दर्जा असलेले कॅप्टन आशिष दामले यांनी खडके कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. गेवराई येथील खडके यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनी कुटुंबीयांची विचारपूस केली तसेच हल्ल्यात जखमी झालेल्या सार्थक सुनीलराव खडके आणि ओम गणेशराव खडके यांच्या प्रकृतीची व सुरू असलेल्या वैद्यकीय उपचारांची माहिती घेतली.

या भेटीदरम्यान जखमींच्या उपचारांसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन कॅप्टन दामले यांनी दिले. अचानक ओढवलेल्या संकटामुळे खडके कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असताना, त्यांना धीर देत या कठीण प्रसंगी कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही त्यांनी दिली. सार्थक यांच्या



वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

हल्ल्याच्या घटनेमुळे परिसरात अस्वस्थता निर्माण झाली असून, जखमींच्या उपचारांसोबतच कुटुंबाला मानसिक आधाराचीही गरज आहे. अशा परिस्थितीत सामाजिक आणि लोकप्रतिनिधी स्तरावरून मिळणारे सहकार्य कुटुंबीयांना दिलासा देणारे (पान २ वर)

पशुपालनातून आर्थिक स्वावलंबनाची संधी

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्यावा-ॲड.कवठेकर

पाटोदा/प्रतिनिधी



ग्रामीण भागातील शेतकरी, बेरोजगार युवक व महिलांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधावी. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील पात्र लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी पशुपालन हा उत्पन्नाचा महत्त्वपूर्ण पर्याय ठरू शकतो. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय, शेळीपालन, मेंढीपालन, कुक्कुटपालन तसेच पशुधनावर आधारित विविध उद्योग उभारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. या माध्यमातून ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला होऊ शकतो.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून पात्र (पान २ वर)

दुष्काळामध्ये आंदोलनासाठी मजबूर करू नका-गटनेते खुर्शीदआलम

मुख्याधिकारी आणि नगरसेवकांची ३ तास बैठक

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्रासह बीड शहरात सुद्धा येत्या काही दिवसांत भयंकर दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन बीड नगरपरिषदेचे गटनेते तथा राष्ट्रवादीचे शपथ चे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी आपल्या सहकारी नगरसेवकांसह बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूळके साहेब यांची तीन तास बैठक घेऊन पाणीपुरवठा, स्वच्छता, लाईट आणि रस्ते विकास कामेसाठी चर्चा करून निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्रात



दुष्काळ जाहीर झाले आहेत. या भयंकर दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडीअडचणीला सामोरे जावे लागणार आहे म्हणून आजपासूनच उपाययोजना करणे आवश्यक आहे, बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावे यासाठी नगरसेवकांचा शिष्टमंडळाने मुख्याधिकारी विक्रम मांडूळके साहेब यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले आहेत. निवेदनात म्हटले आहे की एक्स्टेंशन जोडणीला प्राधान्य द्यावे, बीड शहरातील अर्धवट राहिलेल्या पाईपलाईने जोडण्यात यावी, बीड शहरातील ज्या विहिरीत पाणी आहेत त्या विहिरीतील गाढ काढून ठिकठिकाणी विंधन विहीर बसवण्यात यावे म्हणजे छोटे छोटे टाक्या बसवून (पान २ वर)

शैक्षणिक यशाची उज्ज्वल परंपरा कायम! यंदाही शाळेच्या ५० विद्यार्थ्यांनी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांत मिळवले घवघवीत यश!

बीड/प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही सर सय्यद अहमद खान सेमी इंग्लिश अँड पीपल्स हायस्कूल, बीड या शैक्षणिक संस्थेने आपल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेचा गौरव कायम राखला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळेच्या ५० गुणवंत विद्यार्थ्यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि डिप्लोमा अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळवून आपल्या यशाचा ठसा उमटवला आहे.

विशेष म्हणजे, वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस, डी.फार्म तसेच बी.एस्सी. ऑप्टोमेट्री या अभ्यासक्रमांसह अभियांत्रिकी आणि डिप्लोमा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

वैद्यकीय क्षेत्रात विद्यार्थ्यांची भरारी

एमबीबीएस १३ विद्यार्थी

१) झिया फिशा आरिफ कुरेशी उस्मानाबाद २) शेख मुस्फेरा अब्दुल वकील अल-अमीन, वैजापूर ३) उम्मे अम्मारा मोमीन इसाक छत्रपती संभाजीनगर ४) शेख अक्सा शाहिनशा पुणे ५) अदिबा अन्सारी मुदस्सिर बदनापूर ६) शेख इकरा जलील अल-अमीन, वैजापूर ७) शेख अफिफा इल्हाम शहेराज निमरा, तेलंगणा ८) मोमीन अश्मिरा सरफराज निमरा, तेलंगणा ९) सोहराब कलीम खतीब गुलबर्गा

१०) शेख इकरा इलियास विजयवाडा ११) पठाण गनिया जलीलुल्लाह विजयवाडा



१२) शेख मुनव्वर झहीर फातिमा, कडप्पा १३) शेख अमान अय्युब रशिया बीएएमएस ३ विद्यार्थी १) शेख निखत अहमदी शकील अक्कलकुवा २) आयेशा सिद्दीका अकील कोपरगाव ३) साद खान मुबाशिर खान शिरपूर बीएचएमएस ४ विद्यार्थी १) इरम फातिमा फारुख खान बीड २) अब्दुल रहमान रईस बीड, ३) शेख कनीज फातेमा फारूक - बीड ४) शेख तनीम अनवर-बीड इतर वैद्यकीय अभ्यासक्रम २ विद्यार्थी १) शेख मदीहा समद डी.फार्म २) उस्मानी अरिबा अजाज बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभियांत्रिकी क्षेत्रातही विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

इंजिनिअरिंग १५ विद्यार्थी

१) मोमीन अस्लम मेहरान आसिफ इक्बाल सांगली, २) अन्सारी इझान माजिद सांगली, ३) शेख मोहम्मद अफीफ आदम नाशिक ४) मिर्झा अफीफ बेग मन्सूर बेग पुणे, ५) बागवान हुजैफ नाहेद बीड ६) सय्यद लबीब तारिक बीड, ७) शेख नोमान हमीद छत्रपती संभाजीनगर, ८) मुनीब इब्राहिम सफी अन्वरी पुणे (पान २ वर)

१,५३८ विद्यार्थ्यांनी घेतली बालविवाहमुक्त समाजाची शपथ

आंतरराष्ट्रीय बालविवाह प्रतिबंध दिनानिमित्त जनजागृती; युवा ग्राम विकास मंडळाचा स्तुत्य उपक्रम

धारूर/अतुल शिनगारे



बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्याचा निर्धार करत धारूर व केज तालुक्यांतील तब्बल १ हजार ५३८ विद्यार्थ्यांनी बालविवाह प्रतिबंधाची शपथ घेतली. युवा ग्राम विकास मंडळ आणि महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय बालविवाह प्रतिबंध दिनानिमित्त विविध शाळा, ग्रामपंचायती आणि समुदाय स्तरावर जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला.

बालविवाह, अल्पवयीन विवाह तसेच सक्तीच्या विवाहांचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन या बालहक्कांसाठी कार्यरत देशव्यापी आघाडीच्या मार्गदर्शनाखाली युवा ग्राम विकास मंडळाने या अभियानाचे आयोजन केले.

या अभियानांतर्गत नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह; जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय, असोला; सरस्वती माध्यमिक विद्यालय, (पान २ वर)

मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक २९ नोव्हेंबरला परळीत

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता परळी-गंगाखेड रोडवरील वडगाव (दा.) येथील श्री शंभू महादेव मंदिर, मातीची मायाकृषी पर्यटन केंद्र, नरवणे यांच्या शेतात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस केंद्रीय कार्यकारिणी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माजी आमदार डी.के. देशमुख, नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, अखिल भारतीय किसान सभा राज्य सहसचिव अजय बुरांडे, माझी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, म.ज.वि.प.सचिव प्रा.अर्जुन जाधव, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र आगवान, उपाध्यक्ष शिरीष देशमुख, बीड व परभणी जिल्ह्याचे सचिव प्रा. सुमंत गायकवाड व पदाधिकारी यांची (पान २ वर)

मृदंग महर्षी वै. ज्ञानोबा माऊली लटपटे कोद्रीकर यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त

दोन दिवसीय कीर्तन सोहळा तथा शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी येथील मातोश्री चंद्रभागा आश्रमात वैकुंठवासी ह.भ.प. ज्ञानोबा माऊली लटपटे कोद्रीकर यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६ या कालावधीत भव्य दोन दिवसीय कीर्तन सोहळा, शास्त्रीय मृदंग वादन व संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार, गायक व वादक आपल्या कलेच्या माध्यमातून भक्तिरसाची मेजवानी रसिकांना देणार आहेत.

सोमवार ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता परळी नगरीच्या आदर्श नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर मातोश्री चंद्रभागा आश्रमातील वैकुंठवासी ज्ञानोबा माऊली लटपटे यांच्या विद्यार्थ्यांचा शास्त्रीय मृदंग सोलो वादनाचा विशेष कार्यक्रम होणार आहे.



राञी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. केशव महाराज घुले टाकळीकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून, त्यानंतर मनोहर मुंडे व अनिरुद्ध प्रभाकर वाघचौरे (सोलापूर) यांच्या संगीत भजन व अभंगवाणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मंगळवार, १ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत मृदंग वादकांचा मृदंग सोलो वादन होणार आहे व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. महादेव महाराज राऊत बिडकर यांचे दुपारी १२ ते २ या वेळेत भव्य गुलालाचे (पान २ वर)



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतिनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४० निवासी संपादक : मकरंद जहागीरदार ९४२२२१६०६१

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740) Resident Editor: Makarand Jahagirdar (Mobile No. 9422216061)

parbhani:Layout 1 11/27/2026 9:31 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

परभणी जिल्हा आवृत्ती | शनिवार , दि.२८ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

संविधानाच्या विचारांचा जागर; परभणीत हजारोंच्या सहभागाने भव्य रॅली!

सत्काया फाउंडेशनचा उपक्रम; महिला, युवक, बालकांसह संविधानप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

परभणी/प्रतिनिधी

भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा जागर करण्यासाठी संविधान दिनानिमित्त परभणी शहरात सत्काया फाउंडेशनच्या वतीने गुरुवारी (दि. २६) भव्य संविधान रॅली काढण्यात आली. सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत शहरातील प्रमुख रस्त्यांवरून मार्गक्रमण केलेल्या या रॅलीत हजारो महिला, पुरुष, युवक-युवती, बालकांसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सत्काया



फाउंडेशनचे अध्यक्ष संजय मुळे यांच्या पुढाकारातून या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. संविधान दिन केवळ औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता संविधानाने दिलेले अधिकार,दी कार्यकर्ते, बुद्ध साहित्याचे अभ्यासक आणि विविध सामाजिक संघटनांनी सहकार्य केले. सुरेश प्रधान, विजयकुमार सावंत, पृथ्वीराज आसले, पवन गायकवाड, सुरेंद्र काळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. रॅली शांततेत पार पडण्यासाठी परभणी पोलीस प्रशासना चेही मोलाचे सहकार्य लाभले. संविधानाचा आदर, लोकशाही मूल्यांचे जतन, सामाजिक एकता आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संदेश देणारी ही रॅली परभणीकरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे लक्षवेधी ठरली.

२०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी ठाकरे गटाची हिंगोलीत मोर्चेबांधणी सुरू!

मुंबईत हिंगोलीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक; नव्या नेतृत्वाच्या निवडीकडे लक्ष

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली लोकसभा मतदारसंघात आगामी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिव-सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आतापासूनच राजकीय मोर्चेबांधणी सुरू केली आहे. खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी ठाकरे गटाची साथ सोडून शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर हिंग-ोली लोकसभा मतदारसंघात पक्षासमोर नव्या नेतृत्वाचा शोध आणि संघटनात्मक बांधणीचे आव्हान निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवारी मुंबई येथील शिवसेना भवनात हिंगोली लोकसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीची रणनीती, मतदारसंघातील राजकीय परिस्थिती, पक्ष संघटनेची पुनर्बांधणी तसेच नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत



सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे पारंपरिक राजकीय वर्चस्व राहिले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नागेश पाटील आष्टीकर यांनी विजय मिळवला होता. मात्र, त्यांच्या पक्षांतरामुळे ठाकरे गटाला नव्याने संघटन उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. हे आव्हान लक्षात घेऊन पक्षश्रेष्ठींनी हिंगोली लोकसभा मतदारसंघावर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे या बैठकीतून स्पष्ट होत आहे. या बैठकीला विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पक्षाची ताकद वाढविणे, निष्ठावंत कार्यकर्त्यांना बळ देणे, नव्या नेतृत्वाला संधी देणे आणि मतदारसंघात जनसंपर्क वाढविणे या मुद्द्यांवर बैठकीत भर देण्यात आला. दरम्यान, हिंगोली लोकसभा मतदारसंघातून आगामी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या संभाव्य उमेदवारांच्या नावांचीही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. यामध्ये डॉ. रमेश मस्के यांच्या नावाची विशेष चर्चा होत आहे. त्यांनी मागील काही वर्षांपासून ठाकरे गटात सक्रिय राहून विविध सामाजिक आणि संघटनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून मतदारसंघात जनसंपर्क वाढविला आहे. याशिवाय, शिंदे गटात झालेल्या पक्षप्रवेशामुळे रिक्त झालेल्या जिल्हाप्रमुख पदासह संघटनेतील महत्त्वाच्या पदांवर नव्या नियुक्त्या करण्याबाबतही

डॉ. रमेश मस्के यांना ठाकरे गटाचा ग्रीन सिग्नल?



हिंगोली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास डॉ. रमेश मस्के इच्छुक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मागील काही वर्षांपासून त्यांनी ठाकरे गटात सक्रियपणे काम करत मतदारसंघात आपला जनसंपर्क वाढविला आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघात धनगर माजाची मोठी मतदारसंख्या असल्याने डॉ. मस्के यांच्या उमेदवारीला राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. मितभाषी आणि निष्कलंक व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या डॉ. मस्के यांच्याबाबत पक्षश्रेष्ठी सकारात्मक असल्याची चर्चा आहे. त्यांना संघटनात्मक पातळीवर बळ देण्याबाबतही विचार सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आगामी काळात ठाकरे गट डॉ. मस्के यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, त्यांच्या उमेदवारीबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

पक्षाकडून चाचपणी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. एकंदरीत, खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या पक्षांतरानंतर ठाकरे गटाने हिंगोली लोकसभा मतदारसंघात नव्याने राजकीय ताकद उभी करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. २०२९ च्या निवडणुकीसाठी पक्ष कोणाला नेतृत्वाची संधी देणार आणि हिंगोलीत ठाकरे गटाची नवी रणनीती काय असणार, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे

आदिवासी युवकांना ड्रोन पायलट प्रशिक्षणाची संधी

परभणी/प्रतिनिधी आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आदिवासी युवक-युवतींनाही करिअरच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र युवक-युवतींना 'अमृत ड्रोन मिशन'अंतर्गत ड्रोन पायलट प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.अमृतमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ड्रोन पायलट तयार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.अमृत आणि टीआरटीआय यांच्यातील करारामुळे आदिवासी युवकांनाही या प्रशिक्षणासाठी अर्ज करता येणार आहे. प्रशिक्षणात ड्रोन तंत्रज्ञानाचे सैद्धांतिक ज्ञान, प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि व्यावसायिक कौशल्ये शिकविली जाणार आहेत. शेतीमध्ये फवारणी, पीक निरीक्षण,



जमिनीचे सर्वेक्षण आणि मॅपिंग यांसारख्या कामांसाठी प्रशिक्षित ड्रोन पायलटची मागणी वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात येण्याची आणि आर्थिक स्वावलंबन साधण्याची संधी मिळणार आहे.अनुसूचित जमाती प्रवर्गातील इच्छुक व पात्र युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेण्यासाठी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन टीआरटीआयच्या वतीने निलेश सागर यांनी केले आहे. प्रशिक्षणासाठी जागा मर्यादित असून अधिक माहिती व अर्जासाठी .. (www.amrut-dronemission.com) या संकेतस्थळाला भेट द्यावी

भारतीय बौद्ध महासभेने केला संविधान दिन साजरा.

हिंगणा/नीलम चकोले

भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा व हिंगणा तालुका शाखा यांच्या वतीने पाटील ले आऊट, समता मैदान, वानाडोंगरी जिल्हा सरचिटणीस सतीश सोमकुवर, हिंगणा तालुका अध्यक्ष सिद्धार्थ शंभरकर, इंदीरा गांधी महाविद्याल कळमेश्वरचे प्राचार्य राजेंद्र कांबळे, ऑरेंजसिटी समाजकार्य महाविद्यालय नागपुर चे प्राचार्य महेंद्रकुमार मेश्राम, पत्रकार विनायक इंगळे (गुरुजी), गजानन ढाकूलकर, भारतीय बौद्ध महासभेचे नागपूर जिल्हा अध्यक्ष सुधाकर मेश्राम, महिला जिल्हा अध्यक्ष इंदूताई रामटेके, जिल्हा महिला सरचिटणीस शीतल वाघमारे,



हिंगणा तालुका महिला अध्यक्ष अर्चना मेश्राम व जिल्हा संघटक प्रा. दिलीप मुन उपस्थित होते.प्रा.महेंद्रकुमार मेश्राम व प्रा.राजेंद्र कांबळे यांनी यांनी संविधानावर सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा सरचिटणीस शीतल वाघमारे, ांनी सुद्धा मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन सतीश सोमकुवर यांनी तर आभार प्रा. दिलीप मून यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ शंभरकर, दिनेश पाटील, गणेश पाटील, सुनील नगराळे, प्रा. दीपक रामटेके, सुशीलकुमार खडसे, अर्चना मेश्राम, हेमलता काळे, मंगेश मेश्राम, अशोक डूले, रंजना पाटील, प्रमोद सोमकुवर, विजय मेश्राम, अमोल सोमकुवर, सारिका मेश्राम, वैशाली सोमकुवर, कविता सोमकुवर, संगीता गौरखेडे, अपेक्षा बागडे, सुजाता खोब्रागडे,सिद्धार्थ दीघडे, नरेश कांबळे, संघपाल खोब्रागडे, सोनिया धाबर्डे, रेखा रामटेके,गौतम गजभिये, रितेश देशभ्रतार, करुणा शंभरकर, रवींद्र नरांजे, राजेश गोंडाने, केशव डोंगरे, विजय मुन, अरविंद वाकडे,आणि भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचे सहकार्य लाभले.

सेलू नगर परिषदेत अत्याधुनिक जेटिंग कम सक्शन मशीन

दाखल नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांच्या हस्ते मशीनचे लोकार्पण

परभणी/प्रतिनिधी

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून सेलू नगर परिषदेत अत्याधुनिक जेटिंग कम सक्शन मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या आधुनिक यंत्रामुळे शहरातील नाले, गटारे, शौचालये, सेप्टिक टँक आणि सांडपाणी वाहिन्यांच्या स्वच्छतेच्या कामांना मोठी गती मिळणार आहे. यामुळे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाची भर पडली असून, नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. याशिवाय नगर



परिषदेला अग्निशमन सेवेसाठी फायर ब्रिगेड बुलेट ही गाडीही उपलब्ध झाली आहे. नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २६) जेटिंग कम सक्शन मशीनचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी दीपक वाघमारे, पोलीस निरीक्षक श्रीनिवास रोयलवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय हरबडे, नगरसेवक मनीष कदम, प्रशांत ठाकूर, उद्योजक अविनाश बिहाणी, कार्यालयीन अधीक्षक अंकुश जाधव यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या अत्याधुनिक मशीनमध्ये जेटिंग आणि सक्शन अशा दोन स्वतंत्र प्रणालींचा समावेश आहे.

जेटिंग प्रणालीद्वारे उच्च दाबाने पाणी सोडून गटारांमधील अडथळे दूर करता येणार आहेत.

तर सक्शन प्रणालीच्या माध्यमातून गटारे आणि सांडपाणी वाहिन्यांमध्ये साचलेला गाळ, कचरा व पाणी बाहेर काढणे शक्य होणार आहे. त्यामुळे स्वच्छतेची कामे कमी वेळेत आणि अधिक परिणामकारक पद्धतीने पूर्ण करता येतील.विशेषतः पावसाळ्यात गटारे तुंबणे, सांडपाणी वाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होणे आणि रस्त्यांवर पाणी साचणे अशा समस्यांवर नियंत्रण मिळविण्यास या मशीनची मदत होणार आहे. तसेच सेप्टिक टँक व गटारांची स्वच्छता अधिक शास्त्रोक्त आणि सुरक्षित पद्धतीने करता येणार आहे. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे श्रम कमी होऊन त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे. वीन यंत्रसामग्रीमुळे सेलू शहरातील स्वच्छता व्यवस्थेला आधुनिक बळ मिळणार असून, नागरिकांना स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्याच्या नगर परिषदेच्या प्रयत्नांना अधिक गती मिळणार आहे.

परभणीत राज्यस्तरीय शालेय आर्चरी स्पर्धेचा दिमाखात शुभारंभ राज्यातील आठ विभागांतील २५० खेळाडूंचा सहभाग

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटनउत्कृष्ट प्रशिक्षक व खेळाडूंना 'सारथी पुरस्कार' प्रदान

परभणी/जिमाका

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने तसेच जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या आयोजनातून १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शालेय आर्चरी (धनुर्विद्या) क्रीडा स्पर्धेला आज जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातील आठ विभागांमधील सुमारे २५० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून तीन दिवस धनुर्विद्येतील कौशल्याची चुरस पाहायला मिळणार आहे. दि. २७ ते २९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित या स्पर्धेत नागपूर, अमरावती, लातूर, कोल्हापूर, मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या आठ विभागांतील खेळाडू सहभागी झाले आहेत. विविध विभागांतून आलेल्या बाल खेळाडूंना राज्यस्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. उद्घाटनप्रसंगी छत्रपती पुरस्कारप्राप्त डॉ. प्रा. माधव शेजुळ, जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, नारायणराव पिसाळ, राज्य



क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव, क्रीडा मार्गदर्शक शुभांगी रोकडे, तालुका क्रीडा अधिकारी विठ्ठल भालेराव, शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष रणजीत काकडे, पत्रकार शिवाजी वाघमारे आणि आर्चरी संघटनेचे सचिव मधुकर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळाडूंना अधिक सुविधा उपलब्ध करून देणार - जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण म्हणाले की, परभणी जिल्ह्यात क्रीडाविषयक चांगले वातावरण असून खेळाडूंमध्ये विविध क्रीडा प्रकारांबाबत उत्साह दिसून येत आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष लक्ष देण्यात येईल. खेळाडूंना सराव-ासाठी आणि त्यांच्या कौशल्य विकासासाठी जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या खेळाडूंना परभणीमध्ये स्पर्धेच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी मिळाली आहे. अशा स्पर्धांमुळे खेळाडूंमध्ये खिलाडूवृत्ती, शिस्त, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. तसेच राज्यस्तरावर आपल्या क्रीडा कौशल्याची ओळख निर्माण करण्यासाठीही या स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरतात.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे यांनी केले. सूत्रसंचालन हनुमंत हंबीरे यांनी केले, तर क्रीडा अधिकारी रोहन औंढेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. उत्कृष्ट कार्याबद्दल मान्यवरांना 'सारथी पुरस्कार या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्र आर्चरी संघटनेच्या वतीने धनुर्विद्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रीडा मार्गदर्शक, प्रशिक्षक आणि खेळाडूंना 'सारथी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते अभिजीत दळवी (आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक, अहिल्यानगर), अशोक जंगमे (तांत्रिक समिती, महाराष्ट्र आर्चरी संघटना, लातूर), रंगराव साळुंके (सचिव, हिंगोली), विवेक क्षीरसागर (राष्ट्रीय खेळाडू, परभणी), छायाताई देशमाने (राज्यस्तरीय पदकप्राप्त खेळाडू) आणि महेश शिंदे (राष्ट्रीय प्रशिक्षक) यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी क्रीडा विभागाचे परिश्रमराज्यस्तरीय स्पर्धेचे नियोजन आणि आयोजन यशस्वी करण्यासाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, तालुका क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, रोहन औंढेकर, कनिष्ठ लिपिक गजानन तुडमे, मथुरा काथार, प्रकाश पंडित, धीरज नाईकवाडे, योगेश आदमे, शिवाजी काकडे, इरफान शेख, भागवत दुधारे, गजानन भालेराव, निलेश यादव, किशोर ढोके, नागसेन अटकोरे, कैलास टेहरे, यमनाजी भालशंकर, आशिष परदेशी आदींनी परिश्रम घेतले. तीन दिवस चालणाऱ्या या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंच्या कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले असून, धनुर्विद्या क्षेत्रातील नव्या प्रतिभावान खेळाडूंना पुढे येण्यासाठी ही स्पर्धा महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

दीड वर्षातच सापडगावसेनगाव जोडरस्त्याची दुरवस्था

निकृष्ट झालेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी करून तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली । सेनगाव तालुक्यातील मौजे दाताडा, सुकळी बुद्रुक, सुकळी खुर्द व सापडगाव येथून सेनगावला जाणाऱ्या मुख्य जोडरस्त्याचे काम अवघ्या दीड ते दोन वर्षांपूर्वी करण्यात आले होते. मात्र, अल्पावधीतच या रस्त्याची दुरवस्था झाली असून कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन हिंगोलीचे जिल्हा परिषदचे सीईओ यांच्याकडे गुरुवारी देण्यात आले सापडगाव शिवरस्ता ते सेनगाव येथील हनुमान



मंदिरापर्यंतचा हा जोडरस्ता चार ते पाच गावांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या गावांतील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी हाच मुख्य रस्ता असून शाळा, महाविद्यालय, दवाखाना, बाजारपेठ, तहसील कार्यालय व पंचायत समिती येथे जाण्यासाठी ग्रामस्थांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो मात्र, रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध नागरिक तसेच आजारी व्यक्तींना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या निवेदनात पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या संबंधित रस्त्याची तात्काळ पाहणी करून पंचनामा करण्यात यावा व चार ते पाच गावांना जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने प्राधान्याने दुरुस्ती करण्यात यावी व सदर काम दोषदायित्व कालावधीत असल्याने संबंधित ठेकेदाराकडून विनामूल्य दुरुस्ती करून घेण्यात यावी.व रस्त्याची दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत ठेकेदाराचे बिल अदा करण्यात येऊ नये. दोषदायित्व कालावधी पूर्ण होण्यापूर्वी बिल अदा केले असल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. ग्रामस्थांच्या मागण्यांची तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती न केल्यास नाइलाजास्तव ग्रामस्थांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर विष्णू मुरकुटे सतीश पाचपिल्ले वसंतराव अवचार प्रसाद पाचपिल्ले विजय धाकतोडे यांच्यासह संबंधित गावांतील ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता जिल्हा परिषद बांधकाम विभाग या तक्रारीची कितपत दखल घेतो आणि संबंधित ठेकेदारावर काय कारवाई करतो, याकडे चारही गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

एस.एस.बी. परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी १४ डिसेंबरपासून नाशिक येथे प्रशिक्षण

परभणी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी २ डिसेंबर रोजी मुलाखतीस उपस्थित राहावे

परभणी/जिमाका

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एस.एस.बी.) परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे १४ ते २३ डिसेंबर २०२६ या कालावधीत एस.एस.बी. कोर्स क्रमांक ६८ आयोजित करण्यात आला आहे. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी १३ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहणे आवश्यक आहे. परभणी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी २ डिसेंबर २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे मुलाखतीस उपस्थित राहावे. या प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवारांनी कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएस) अथवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी (एनडीए) अथवा एअर फोर्स कॉमन ॲडमिशन टेस्ट (एएफसीएटी) परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी व संबंधित सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र असणे आवश्यक आहे. तसेच एनसीसी स्पेशल एन्ट्रीसाठी एस.एस.बी. मुलाखतीचे कॉल लेटर असणे आवश्यक आहे. टेक्निकल पदवी अभ्यासक्रमासाठी एस.एस.बी. मुलाखतीचे कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणालीअंतर्गत प्रवेशासाठी एस.एस.बी. कॉल लेटर असणे किंवा एस. एस. बी. साठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीत नाव असणे आवश्यक आहे. असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविली आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगभित्र

गोविंदसिंह राजपूत (जिल्हा प्रतिनिधी) ९९२१८७६५००

PRGI.No.- MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

वंदयत्व : मुल बाळ होत नसल्यास, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै.
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

रक्ताच्या नात्यांनी नाकारले; डॉक्टरांनी दिला आधार!

७ महिन्यांपासून रुग्ण सेवा... शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयाने जपली माणुसकी!

धाराशिव । प्रतिनिधी

रक्ताची नाती संकटाच्या काळात साथ सोडतात, तेव्हा माणुसकीची नाती नव्याने जन्म घेतात! याचाच प्रत्यय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे आला आहे. अपघातात गंभीर जखमी झालेला, कुटुंबीयांनी वाऱ्यावर सोडलेला आणि भाषेच्या अडचणीमुळे स्वतःची ओळखही सांगू न शकणारा एक परप्रांतीय रुग्ण तब्बल सात महिने रुग्णालयात उपचार घेत असताना त्याच्या पाठीशी मात्र रक्ताचे नातेवाईक नव्हे, तर डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचारी खंबीरपणे उभे राहिले. वैद्यकीय उपचारांसोबतच घरच्यांची माया, आधार आणि आपुलकी देत या संपूर्ण टीमने माणुसकीचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे.

४० वर्षीय राजेंद्र कुमार हे मूळचे बिहार राज्यातील कनिका गावचे रहिवासी असून कामानिमित्त महाराष्ट्रात आले होते. सुमारे सात महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातात त्यांच्या डाव्या पायाचे हाड तुटून बाहेर आले होते. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर होती. अशा अवस्थेत त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे दाखल करण्यात आले.

रुग्णासोबत एकही नातेवाईक नव्हता. भाषेची अडचण असल्याने स्वतःची ओळख सांगणेही त्यांना शक्य होत नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीत अस्थिरोग विभागाच्या डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले. डॉ. बालाजी भराटे यांनी आवश्यक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. त्यानंतर सातत्यपूर्ण वैद्यकीय उपचार, योग्य देखभाल आणि पुनर्वसनामुळे रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. मृत्यूच्या छायेतून बाहेर आलेला हा रुग्ण आज आधाराच्या साहाय्याने चालण्यास सक्षम झाला आहे. ७ महिन्यांच्या या प्रदीर्घ प्रवासात डॉक्टर,



परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी राजेंद्र कुमार यांची स्वतःच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे काळजी घेतली. औषधोपचारांपासून ते दैनंदिन गरजांपर्यंत प्रत्येक बाबीची जबाबदारी कर्मचाऱ्यांनी आपुलकीने पार पाडली. रुग्णाला केवळ औषधोपचारच नव्हे, तर मानसिक आधार आणि मायेची ऊबही मिळाली. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली अस्थिरोग विभागप्रमुख डॉ. बालाजी भराटे, डॉ. आकाश भाकरे, डॉ. विकास बाराते, इन्चार्ज सिस्टर जयश्री दारेकर, भाग्यशाला पुरी, समाजसेवक मयेश खंडागळे आणि महेश अडकल यांनी विशेष पुढाकार घेतला. रुग्णाला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, यासाठी विभागाच्या वतीने वॉकरही उपलब्ध करून देण्यात आला.

रुग्णावर उपचार सुरू असतानाच रुग्णालय प्रशासनाने त्याच्या कुटुंबीयांचा शोध घेण्यास सुरुवात केली. अनेक प्रयत्नांनंतर बिहारमधील त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात यश आले. मात्र, रुग्णाची प्रकृती सुधारल्यानंतरही त्याला घरी घेऊन जाण्यास नातेवाईक तयार नव्हते. काहींनी तर त्याला आश्रमात सोडण्याचा सल्लाही दिला. ज्या कुटुंबीयांनी संकटाच्या काळात आधार द्यायला हवा होता, त्यांनीच जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिल्याने रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांसमोर नवे सामाजिक आव्हान उभे राहिले.

एका बाजूला मृत्यूशी झुंज देत रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णावर उपचार करून त्याला पुन्हा चालण्यायोग्य बनविणे, तर दुसऱ्या बाजूला तब्बल सात महिने त्याच्या दैनंदिन गरजांची काळजी घेणे, कुटुंबीयांचा शोध घेणे आणि त्याला पुन्हा आपल्या घरी पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे, अशी दुहेरी जबाबदारी रुग्णालयातील टीमने समर्थपणे पार पाडली. रुग्णावर वेळेत केलेले उपचार, त्यानंतर घेतलेली सातत्यपूर्ण काळजी आणि सामाजिक बांधिलकीचे भान याबद्दल अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांनी संपूर्ण टीमचे कौतुक केले. तसेच समाजसेवकांना रुग्णाच्या नातेवाईकांशी समन्वय साधून त्याला लवकरात लवकर सुखरूप घरी पोहोचविण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या.

संकटात ज्यांनी साथ द्यायला हवी होती, त्यांनीच पाठ फिरवली; मात्र पूर्णपणे अनोळखी असलेल्या या रुग्णासाठी डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी आपुलकीचे नाते निर्माण केले. रुग्णालय हे केवळ आजारांवर उपचार करण्याचे ठिकाण नसून, गरज पडल्यास माणुसकीचा आधार देणारे घरही ठरू शकते, हे धाराशिवच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील टीमने आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन एका अनोळखी व्यक्तीसाठी सात महिने घेतलेली ही काळजी म्हणजे केवळ आरोग्यसेवा नाही, तर माणुसकीचा जिवंत आणि प्रेरणादायी आदर्श आहे!

लोहगाव येथे संविधान दिनानिमित्त बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन



लोहगाव । निजाम शेख

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथील मातोश्री जिजामाता विद्यालय व कै. प्रभाकर भस्मे उच्च माध्यमिक विद्यालय येथे भारतीय संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाजी मोरेक व विद्यालयाच्या प्राचार्या प्रतिभा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर शिक्षक शेखर कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी हि आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सहशिक्षक शंकर चिवरे, नेताजी क्षिरसागर, शेखर कलशेट्टी, नागनाथ जमादार, प्रा. धोंडिराम सिरसाठ, प्रा.गुणवंत जगताप, प्रा.अशोक शाबासे, प्रा.औतुकुर चव्हाण, प्रा विश्वास माने, प्रा.गणेश बनसोडे, प्रा.अक्षय कदम, प्रा. ज्योती माने, प्रा.शशिकला थोरात, लक्ष्मी गायकवाड, वनिता लोखंडे, संजय मोरकर, आलम तांबोळी, परमेश्वर चौधरी, विठ्ठल बनसोडे, यांच्यासह आदिजन उपस्थित होते.

दलित, मजूर आणि कामगारासाठी डॉ.आंबेडकर यांनी कल्याणकारी योजना राबवल्या : कुंभार

धाराशिव । प्रतिनिधी

देशातील दलित, असंघटित कामगार आणि मजूर यांच्यासाठी विविध कल्याणकारी योजना डॉक्टर बाबासाहेबांनी राबवल्या, गरिबांचे तारणहार म्हणून उदयाला आले असे मत प्रभारी मुख्याध्यापक सतीश कुंभार यांनी व्यक्त केले. भारतीय संविधान दिन शिंगोली आश्रम शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती सुरेखा कांबळे, प्रमुख पाहुणे श्रीमती बालिका बोयणे यांनी भारतरत्न, महामानव भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून श्रीफळ फोडून प्रतिमेचे पूजन केले. पर्यवेक्षक रत्नाकर पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक



मनोगतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुलभुत हक्क व अधिकाराची जाण ठेवून लोककल्याणकारी संविधानाची निर्मीती केली आशी माहीती दिली.

प्रभारी मुख्याध्यापक सतीश कुंभार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मांडले, सत्तेची वाटेकरी जमात बना, बाबासाहेबांनी दर रोज २१ तास अभ्यास करून अनेक पदव्या प्राप्त केल्या. रस्त्यावरील दिव्याच्या खांबा खाली बसुन अभ्यास केला. पुस्तकाचा संग्रह केला. भारतीय राज्यघटना निर्माण करण्यासाठी तीन वर्ष अथक परिश्रम घेतले. नदी जोड प्रकल्प राबविण्यासाठी सांगितले. दीन, दलित, कामगार, शेतमजूर, शेतकरी संकटात सापडला असताना अनेक योजना आखल्या आहेत. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जिल्हाधिकारी, तहसिलदार, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगपती, व्यापारी, आपण होऊन आपल्या वस्ती, तांडा, गाव, तालुका, जिल्हा, राज्य, आपला देश महासत्ता बनण्यासाठी कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आपला महाराष्ट्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे. फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेच विचार आपल्याला तारू शकतात. यावेळी पडवळ खंडू, शानिमे कैलास, क्रिडा शिक्षक सुधीर कांबळे, वरीष्ठ लिपिक मस्के संजयकुमार, राठोड प्रशांत, कोणदे मल्लिनाथ, इरफान शेख, विशाल राठोड, सचिन राठोड, श्रीमती सूर्यवंशी, ज्योती साने, ज्योती राठोड, कर्मचारी गोविंद बनसोडे, वसंत भिसे, रेवा चव्हाण, अविनाश घोडके, सागर सुर्यवंशी, अमोल जगताप व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

तुळजापूर पंचायत समितीच्या प्रभारी सभापतीपदी कोरे

लोहगाव । निजाम शेख



तुळजापूर पंचायत समितीच्या प्राभारी सभापतीपदी जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती असलेल्या सिध्देश्वर कोरे यांची निवड झाली आहे. तात्कालिन सभापती विक्रमसिंह देशमुख यांनी राजीनामा दिल्यानंतर पद रिक्त झाल्याने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे एकनिष्ठ आणि विश्वासू सहकारी म्हणून परिचित असलेले कोरे यांच्याकडे प्रभारी सभापतीपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतर कोरे समर्थकांमध्ये आनंद, उत्साहाचे वातावरण दिसून येत असून त्यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. तर आगामी काळात तुळजापूर पंचायत समितीच्या सभापती पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार यांची उत्सूकता निर्माण झाली आहे.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात लोहारा तहसील जिल्ह्यात प्रथम

लोहारा । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या 'भारताची जनगणना २०२७' अंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामकाज विहित मुदतीपूर्वी आणि अचूकपणे पूर्ण करत लोहारा तहसील कार्यालयाने धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण चार्ज कार्यालयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते तहसीलदार रणजितसिंह कोळेकर आणि त्यांच्या पथकाचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

जनगणनेसारख्या महत्त्वपूर्ण मोहिमेचे काम वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करण्यासाठी तहसीलदार कोळेकर यांनी नियोजनबद्ध पद्धतीने यंत्रणेला दिशा दिली. महसूल अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक आणि प्रगणक यांच्यात समन्वय ठेवत कामाचा नियमित आढावा घेण्यात आला. त्यामुळे



निर्धारित वेळेपूर्वी पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण करणे शक्य झाले. या मोहिमेत सर्व कर्मचाऱ्यांनी सांघिक भावनेतून योगदान दिले. प्रशासकीय नियोजन, कामातील अचूकता आणि समन्वयाच्या जोरावर लोहारा तहसील कार्यालयाने जिल्ह्यातील अन्य ग्रामीण चार्ज कार्यालयांच्या तुलनेत आघाडी घेतली. या यशाबद्दल तहसीलदार कोळेकर आणि त्यांच्या पथकाचे विविध स्तरांतून अभिनंदन होत.

धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळणे हा संपूर्ण लोहारा तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. हे यश केवळ माझे वैयक्तिक नसून महसूल अधिकारी, बीएलओ, बीएलए, पर्यवेक्षक, प्रगणक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या अहोरात्र परिश्रमांचे फळ आहे. सर्वांच्या सांघिक प्रयत्नांमुळे आणि अचूक नियोजनामुळे निर्धारित उद्दिष्ट मुदतीपूर्वी पूर्ण करता आले.

– रणजितसिंह कोळेकर,
तहसीलदार, लोहारा

जेवळीच्या गुरुसिद्धेश्वर मठात सहस्र दीपाराधना

लोहारा । प्रतिनिधी

कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील जेवळी येथील श्री गुरुसिद्धेश्वर विरक्त मठात मंगळवारी (ता. २४) पारंपरिक सहस्र दीपाराधना कार्यक्रम भक्तिभावात पार पडला. मठाधीश म.नि.प्र. गुरु गंगाधर महास्वामीजी यांच्या सान्निध्यात झालेल्या या सोहळ्यात शेकडो पणत्यांच्या प्रकाशाने मठ परिसर उजळून निघाला. यावेळी जेवळीसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जीवनातील अज्ञान आणि दुःखाचा अंधकार दूर होऊन सुख-समृद्धीचा प्रकाश नांदावा, या भावनेतून दरवर्षी मठात दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. सायंकाळी महास्वामीजींच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मठाचे शिष्य पोलीस कॉन्स्टेबल रविराज मडोळे यांनी साकारलेली आकर्षक रांगोळी भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. नवनिहाळ (जि. कलबुर्गी) येथील श्रीनाथ बिरादार, विजय बिरादार, नागराज बिरादार, मंजुनाथ बिरादार, संगप्पा महागाव, सतीश बिरादार आणि गोरखनाथ बिरादार यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुरूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बसवराज कारभारी, संचालक दौलप्पा तोरकडे, पंचायत समिती सदस्य नागनाथ पाटील, सरपंच मारुती कार्ले, वैभव पवार, मल्लिनाथ डिग्गे, शिवराज चिनगुंडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजय तांबडे, सोमनाथ बिराजदार, रविराज सोळशे, उमाकांत पणुरे, रोहित कारभारी, योगीराज सोळशे, वेदांत धरणे, ओमकार कारभारी, सचिन हुळमजगे, राहुल गुरव यांच्यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

भूम तालुक्यात जलसाठ्यांची पातळी ५० टक्क्यांखाली

भूम । प्रतिनिधी

तालुक्यात वाढत्या तापमानामुळे विविध पाटबंधारे प्रकल्पांतील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. तालुक्यातील आठ लघुप्रकल्प, तीन मध्यम प्रकल्प आणि चार साठवण तलावांमधील पाण्याची पातळी ५० टक्क्यांखाली आली आहे. काही प्रकल्पांमध्ये तर जेमतेम तीन ते सात टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

गेल्या वर्षी झालेल्या दमदार पावसामुळे तालुक्यातील बहुतांश तलाव ओसंडून वाहत होते. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने सुरुवातीपासूनच जलसाठ्यांवर परिणाम झाला आहे. त्यात नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात तापमानात वाढ झाल्याने पाण्याची पातळी आणखी घसरत आहे. १९ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार, पाथरूड लघुप्रकल्पात ३.६५ टक्के, जांबमध्ये ५.९३८ टक्के, रामगंगा मध्यम प्रकल्पात ५.६० टक्के, बांगलवाडीमध्ये ७.५६२ टक्के, गोरमाळा येथे १४.२८ टक्के, उमाचिवाडी साठवण तलावात १७.३१२ टक्के, आर्सोलीत २२.४५ टक्के, बाणगंगा मध्यम प्रकल्पात ३७.२६ टक्के, कुंथलगिरीत ४१.४४ टक्के, वाकवडमध्ये ४१.८० टक्के, तर नांदगाव साठवण तलावात ४७.७१ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे.

सध्या मानवी पाणीपुरवठ्याची स्थिती समाधानकारक असली, तरी जलसाठ्यातील घट कायम राहिल्यास आगामी काळात पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ शकते. डिसेंबर आणि जानेवारीत थंडी टिकून राहिल्यास बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन पाणीसाठा टिकण्यास मदत होईल. मात्र, तापमानवाढ कायम राहिल्यास हिवाळ्यातही तलावांची पातळी घटण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. यंदा मात्र कमी पावसामुळे तालुक्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. पाटबंधारे विभागाचे प्रकल्पांवर नियंत्रण असल्याने पाण्याचा गैरवापर टाळला जात असल्याचे सांगण्यात येते. मात्र, उपलब्ध पाणीसाठा उन्हाळ्यापर्यंत पुरणार का, असा प्रश्न आता शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

मस्के यांना कर्मचारी संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

धाराशिव । प्रतिनिधी



तासगाव जिल्हा सांगली येथील महिला बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य रत्नाकर मस्के यांना आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. राहुल नगर, पैठण (जिल्हा छत्रपती संभाजी नगर) येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विद्यार्थी प्रिय असणाऱ्या रत्नाकर मस्के यांच्या दुर्दैवी अकाली निधनाने, मस्के कुटुंबीयांना दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशी भावना श्रद्धांजली अर्पण करताना, आश्रम शाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना धाराशिव यांच्यावतीने सतीश शहाजी कुंभार यांनी व्यक्त केली.

संविधानाच्या जागरासोबत विद्यार्थ्यांचा नशामुक्तीचा संकल्प

धाराशिव । प्रतिनिधी

भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूलभूत मूल्यांचा जागर करीत शहरातील विद्यार्थ्यांनी संविधानाप्रती आदर आणि नशामुक्त समाजनिर्मितीचा संकल्प केला. भारतीय संविधान दिनानिमित्त जिल्हा परिषद कन्या प्रशालेत आयोजित कार्यक्रमात संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच शहरातून जनजागृती रॅली काढून नशामुक्त धाराशिवचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. मुंबईतील २६ नोव्हेंबर २००८ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसह मृत नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. डॉ. संदीप तांबारे यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ



दिली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले, समाजकल्याण अधिकारी सनम लांबकाने यांची उपस्थिती होती. शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट व गाईडचे विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे जिल्हा परिषद येथे रॅलीचा समारोप झाला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी नशामुक्तीच्या घोषणा देत नागरिकांमध्ये जनजागृती केली. कार्यक्रमाला उपशिक्षणाधिकारी लांडगे, विस्तार अधिकारी मैंदरगी, जंगम, समाजकल्याण निरीक्षक अतुल जगताप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

संविधान दिनाचे ऐतिहासिक महत्त्व

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय संविधानाचा स्वीकार केला. २६ जानेवारी १९५० पासून संविधान देशात लागू झाले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य तसेच दर्जाची व संधीची समानता प्रदान केली आहे. या मूल्यांची जाणीव विद्यार्थिदशेतच रुजावी आणि तरुण पिढी व्यसनांपासून दूर राहून जबाबदार नागरिक म्हणून घडावी, या उद्देशाने संविधान दिनी नशामुक्तीचा संदेश देण्यात आला.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

महापालिकेच्या १०५ शाळांसाठी केवळ आठ क्रीडाशिक्षक; विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना खीळ!

दापोडी । प्रतिनिधी

महापालिकेच्या सर्व शाळा स्मार्ट, डिजिटल होत असताना क्रीडा विभागाकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. महापालिकेच्या १०५ शाळांमध्ये केवळ आठच क्रीडा शिक्षक आहेत. क्रीडा साहित्यही उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना खेळापासून वंचित राहावे लागत आहे. महापालिकेच्या विविध शाळांमध्ये क्रीडा, संगणक आणि कलाशिक्षकांची वानवा असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर आणि क्रीडाकौशल्यावर परिणाम होत असल्याचे चित्र समोर आले आहे. विशेषतः दापोडी, कासारवाडी आणि फुगेवाडी परिसरातील महापालिका शाळांमध्ये क्रीडाशिक्षकच नाहीत. गोरगरीब घरातील विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

शाळेत अधिक पटसंख्या असल्याशिवाय क्रीडाशिक्षकाची नेमणूक करता येत नसल्याचा नियम राज्य शिक्षण प्रशासनाने शिथिल करावा, अशी मागणी शाळांच्या मुख्याध्यापकांकडून करण्यात येत आहे. दापोडीतील शहीद अशफाकउल्ला खान उर्दू शाळेत पहिली ते आठवीपर्यंत एकूण २२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ज्यात ११३ मुले आणि ९६ मुलींचा समावेश आहे. या शाळेत संगणक उपलब्ध असले तरी क्रीडाशिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांच्या मैदानी खेळांच्या प्रशिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशीच काहीशी अवस्था फुगेवाडी येथील महापालिका शाळेची असून, तेथे २१२ पटसंख्या आहे. शाळेत विविध उपक्रम राबवले जातात. मात्र, क्रीडाशिक्षकाअभावी विद्यार्थ्यांना खेळाचे योग्य धडे मिळत नाहीत.

कासारवाडीतील महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेचीही हीच व्यथा आहे. ही एक उपक्रमशील शाळा असून, येथे बालवाडीत ८३, तर प्राथमिक विभागात एकूण २४० (१२७ मुले व ११३ मुली) पटसंख्या आहे. या शाळेत एका शिक्षकाची कमतरता भासत आहे. तसेच, कासारवाडी माध्यमिक शाळेचा पट ८६ असून, त्यात ५३ मुले व ३४ मुली शिक्षण घेत आहेत. परिसरातील विद्यार्थ्यांसोबतच डुडुळगाव येथील विद्यार्थीही येथे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेत आहेत. या सर्व शाळांमधून क्रीडा, कला आणि संगणक शिक्षकांची मागणी वारंवार करण्यात येत आहे. क्रीडाशिक्षक नसल्याची शाळेतील अनेक खेळाडू विद्यार्थ्यांनी खंत व्यक्त केली आहे.

दुष्काळामुळे आता बांधकामांना प्रक्रिया केलेले पाणी वापरणे सक्तीचे; पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नवीन धोरण

पिंपरी । प्रतिनिधी

शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे आणि जलस्रोतांवरील ताणामुळे पिण्याच्या पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यातच बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्याने भूजल पातळीवर गंभीर परिणाम होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेने आता मोठा आणि पर्यावरणपूरक निर्णय घेण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. बांधकामासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर बंधनकारक करण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची बचत होऊन पाणी टंचाईत शहराला दिलासा मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहर परिसरात गेल्या सात वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. यंदा राज्यभर दुष्काळ आहे. त्यासाठी महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. प्रक्रिया केलेले सांडपाणी हे काही उद्यानांना वापरले जात आहे. आता बांधकाम प्रकल्पांना पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. महापालिकेच्या मैलाशुद्धीकरण केंद्रातून एकूण ५० एमएलडी प्रक्रिया केलेले सांडपाणी उपलब्ध होते. मात्र, बांधकाम क्षेत्रात त्याचा वापर बंधनकारक नसल्याने मोठ्या प्रमाणात पिण्याच्या व बोअरींगच्या पाण्याचा वापर केला जातो. नागपूर, सुरत, बंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी उद्योग व बांधकाम क्षेत्रासाठी पुरविले



जाते. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्येही प्रक्रिया केलेले पाणी बांधकामांना वापरण्याचे धोरण राबवण्यात येत आहे. पाणी टंचाई आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकास साध्य करण्यासाठी, पाण्याची बचत करण्यासाठी व जलसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी सर्व बांधकाम प्रकल्पांसाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर अनिवार्य करण्यात येणार आहे. प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर न केल्यास संबंधित व्यक्ती व संस्थेविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

बांधकामासाठी शंभर टक्के प्रक्रिया केलेले पाणी वापर बंधनकारक

बांधकामाकरिता १०० टक्के प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक करणे, ही अट बांधकाम परवानगी नियमावलीमध्ये समाविष्ट केली जाणार आहे. त्यासंदर्भात नियमावली तयार करण्यात येत आहे. पाण्यासाठी विकासकाने किंवा बाधकाम व्यावसायिकाने शुल्क जमा केल्यानंतर ते पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच, जास्त पाणी लागल्यास, महापालिकेच्या मैलाशुद्धीकरण केंद्रातून प्रचलित दरानुसार पाणी उपलब्ध केले जाणार आहे.

पाण्याचा पुनर्वापर झाल्याने पिण्याच्या पाण्याची होणार बचत

सध्या बांधकाम प्रकल्प बोरवेलचे पाणी वापरतात. त्यामुळे याचा परिणाम जमिनीतील पाणी पातळीवर होत आहे. नवीन धोरणामुळे शहरातील पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. तसेच, चोरी थांबणार आहे. त्याचबरोबर सांडपाण्याचा पुनर्वापर झाल्याने पर्यावरणाचे रक्षण होईल व महापालिकेला महसूलही मिळेल, यासाठी धोरण राबविण्यात येणार आहे. महापालिकेच्या सर्व मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्रात टँकरने पाणी भरण्याकरिता व्यवस्था केली आहे. सद्यस्थितीत टँकर किंवा पाइपलाइनने पाणी हवे असल्यास टँकर किंवा पाइपलाइनची व्यवस्था संबंधित बांधकाम व्यावसायिकांनी स्वखर्चाने करणे आवश्यक असणार आहे.

वाढत्या नगरीकरणामुळे भविष्यात पाणी प्रश्न तीव्र होऊ नये, यासाठी महापालिकेच्यावतीने कठोर पावले उचलली जात आहेत. शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम प्रकल्प होत असल्याने भूजल पातळीवर परिणाम होत आहे. त्यामुळे बांधकामांसाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचाच वापर बंधनकारक करण्यात येणार आहे; अन्यथा कारवाई केली जाईल. यासंदर्भात विकासक व बांधकाम व्यावसायिकांना काही अडचणी असल्यास त्यांना मदत केली जाणार आहे.

– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील ६० कोटींच्या बोगस उपसूचना घोटाळ्याचा प्रस्ताव दप्तरी दाखल

पिंपरी । प्रतिनिधी

बोगस उपसूचनेद्वारे तब्बल ६० कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांच्या आर्थिक घोटाळा पिंपरी-चिंचवड शहरात चांगला गाजला होता. त्या रक्कमेच्या बिलाच्या वर्गीकरणास मान्यता देण्याचा प्रशासनाकडून पुन्हा सादर करण्यात आलेला प्रस्ताव स्थायी समितीच्या बुधवारच्या (दि.२५) सभेत अखेर, दप्तरी दाखल करण्यात आला. ठेकेदारांनी ती काम पूर्ण केले की नाही, त्याचा दर्जा कसा होता, त्याचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या प्रस्तावाला मंजुरी दिली जाईल, असे समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले आहे.

सभेसमोर वरील प्रस्ताव मंजुरीसाठी होता. महापालिकेच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पास महापालिका सभेने २४ मार्च २०२६ ला मान्यता दिली. त्यानंतर नगरसेवकांनी दिलेल्या वेगवेगळ्या १७ पैकी १४ बोगस उपसूचना देऊन मुख्य लेखा व वित्त विभागाने परस्पर मंजूर करून, तब्बल ६० कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांची बिले मर्जीतील ठेकेदारांना अदा करण्यात आली. हा प्रकार ३० मार्च २०२६ ला घडला होता. त्या प्रकार मुख्य वित्त व लेखा अधिकारी प्रवीण जैन यांनी केल्या असून, त्यांच्यावर कारवाई करावी, अशी तक्रार स्थायी समितीचे अध्यक्ष बारणे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली होती. त्यानंतर आयुक्तांनी जैन यांना १० एप्रिलला तत्काळ सक्तीच्या रजेवर पाठवले होते. तसेच, अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती.

समितीने १२ जूनला चौकशी अहवाल आयुक्तांना सादर केला. त्यात १४ उपसूचना बोगस असल्याचे आढळून आले. त्याद्वारे एकूण ६०कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांची बिले परस्पर लेखा व वित्त विभागाकडून अदा करण्यात आली होती. त्यासाठी स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली नव्हती. तो चौकशी अहवाल कारवाईसाठी आयुक्तांनी राज्य शासनाच्या वित्त विभागाकडे पाठवला. मात्र, त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. दरम्यान, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची नवी मुंबई महापालिकेत बदली झाली. तसेच, या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच, कोणावरही कारवाई झालेली नाही.

असे असताना प्रशासनाने नगरसेवकांच्या १४ बोगस उपसूचनेद्वारे ठेकेदारांना अदा करण्यात आलेल्या ६० कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांची तरतूदीनुसार अर्थसंकल्पात झालेल्या वाढ व घट करण्यास मान्यता देऊन महापालिका सभेकडे शिफारस करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने १६ सप्टेंबरच्या सभेत तहकूब केला होता. तो प्रस्ताव पुन्हा समितीसमोर ठेवण्यात आल्याने दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

त्या संदर्भात अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले की, निमयबाह्यपणे ६० कोटी १८ लाख रुपयांची बिले ठेकेदारांना देण्यात आली. त्या ठेकेदारांनी काम व्यवस्थित केलेले आहे का, त्याचा दर्जा योग्य आहे का, पाच महिने उलटूनही त्या संदर्भातील अहवाल प्रशासनाने दिलेला नाही. ती कामे खरोखर झाली का नाही, हे समजले पाहिजे. अहवाल दिल्यानंतर त्या प्रस्तावाला मंजुरी दिली जाईल. दप्तरी दाखल केल्याने तो विषय सर्वसाधारण सभेसमोर जाऊ शकतो. ती सभा सर्वोच्च असल्याने त्यावर निर्णय घेईल.

अध्यक्षांनी अंग काढून घेतल्याचा विरोधकांचा आरोप

बोगस उपसूचना देऊन मर्जीतील ठेकेदारांना तब्बल ६० कोटी १८ लाखांची बिले अदा करण्यात आल्याचा घोटाळा स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी आयुक्तांकडे तक्रार करून बाहेर काढला. ती कामे झाले की नाही याचा अहवाल अद्याप आल नाही. त्या प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही. काही नगरसेवकांच्या खोट्या सह्या असल्याचे तक्रारी आहेत. त्याबाबतही काही कारवाई झाली नाही. त्या घोटाळाात संबंधित विभागप्रमुखही सामील आहेत. असे असताना, तो प्रस्ताव दप्तरी दाखल करून, अध्यक्ष बारणे हे आपले अंग काढून घेत आहेत. आता तो विषय सर्वसाधारण सभेसमोर जाणार आहे, असा आरोप शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी केला. तसेच, इंटरनेटचे बिल ठेकेदाराने भरले नसल्याने महापालिकेची डीएमएस प्रणाली गेल्या चार महिन्यांपासून ठप्प असल्याचे दैनंदिन कामकाजाचा खोळंबा झाला आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

मी अंग काढून घेतलेले नसल्याचा अध्यक्षांचा दावा

या प्रकरणाची तक्रार मी स्वत: केली आहे. स्थायीस समिती व सर्वसाधारण सभेला डावलून परस्पर ती बिले देण्यात आली. त्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांच्यावर कारवाई झाली. दिलेल्या बिलांनुसार प्रत्यक्ष काम झाले की नाही, याचा अहवाल संबंधित विभागाने सादर केल्यानंतर त्या विषयाला मंजुरी दिली जाईल. या प्रकरणातून मी अंग काढून घेतलेले नाही, असा दावा स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी केला आहे. डीएसएम प्रणाली प्रशासन काळात आणण्यात आली आहे. त्या संदर्भात लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोशीतील शेततळ्यात बुडून मामा-भाच्याचा मृत्यू

पिंपरी । प्रतिनिधी

घराजवळील शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या मामा-भाच्याचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. कुटुंबीयांनी दोघांना पाण्याबाहेर काढून तातडीने रुग्णालयात नेले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. ही घटना बुधवारी (दि. २५) सायंकाळी सातच्या सुमारास मोशी येथील बनकरवस्ती येथे घडली. सिद्धांत उत्तम लगाडे (वय २१) आणि रितेश रमेश ताकपेरे (१२, दोघेही रा. बनकरवस्ती, मोशी) अशी मृत्युमुखी पडलेल्या मामा-भाच्याची नावे आहेत. या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिस निरीक्षक भोजराज मिसाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धांत हा रितेशचा मामा होता. बुधवारी दोघेही घराजवळ असलेल्या शेततळ्यात पोहण्यासाठी गेले होते. पोहत असताना दोघेही पाण्यात बुडाले. याबाबत माहिती मिळताच कुटुंबीयांनी शेततळ्याकडे धाव घेतली. दोघांना पाण्याबाहेर काढून उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी दोघांचाही उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे जाहीर केले. एकाच घटनेत कुटुंबात दोन सदस्यांचा मृत्यू झाला. अवघ्या बारा वर्षांच्या रितेशसह तरुण सिद्धांतचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. एमआयडीसी भोसरी पोलिस तपास करीत आहेत.

दोघांनाही पोहता येत नव्हते

सिद्धांत आणि रितेश या दोघांनाही पोहता येत नव्हते. असे असतानाही दोघे घराजवळील शेततळ्यात पोहण्यासाठी उतरले होते. दरम्यान, पाण्यात उतरल्यानंतर दोघेही बुडाले. कुटुंबीयांना याबाबत माहिती मिळेपर्यंत बराच उशीर झाला होता. नव्याने तयार केलेले शेततळे जीवघेणे

घटनास्थळी असलेले आठ फूट खोल शेततळे अवघ्या दोन दिवसांपूर्वीच तयार करण्यात आले होते. घटनेच्या दिवशीच या शेततळ्यात पाणी सोडण्यात आले होते. मात्र, पहिल्याच दिवशी हे शेततळे मामा-भाच्यासाठी जीवघेणे ठरल्याने शोक व्यक्त होत आहे.

महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविणाऱ्या अमोल जाधवर यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार

पिंपरी । प्रतिनिधी

महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ अंतर्गत आयोजित 'करवीर क्रीडास्पंदन २०२६' या स्पर्धेत खो-खो क्रीडाप्रकारात उल्लेखनीय कामगिरी करून सुवर्णपदक पटकाविणाऱ्या अमोल जाधवर यांचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील महापौर कक्षात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



क्रीडा क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम, जिद्द, शिस्त आणि संघभावना महत्त्वाची असते. अमोल जाधवर यांनी या गुणांच्या बळावर राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेले यश निश्चितच कौतुकास्पद असून, त्यांची कामगिरी इतर खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे, असे महापौर लांडगे यांनी यावेळी सांगितले. गुणवंत खेळाडूंच्या कामगिरीचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासह शहरातील क्रीडा संस्कृती अधिक समृद्ध करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे, असेही महापौर लांडगे यांनी नमूद केले. अमोल जाधवर यांनी भविष्यातही आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करावे, अशा शुभेच्छा महापौर लांडगे यांनी यावेळी दिल्या.

संविधान दौड, प्रबोधनात्मक गीतगायन आणि व्याख्यानातून संविधान मूल्यांचा जागर

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा

पिंपरी । प्रतिनिधी

भारतीय संविधानाप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करत संविधानातील लोकशाही, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचा जागर करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संविधान दौड, प्रबोधनात्मक गीतगायन, व्याख्यान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दिवसाची सुरुवात चिंचवड येथील क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे स्मारक येथून संविधान दौडीने झाली. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते दौडीचे उद्घाटन करण्यात आले. चिंचवड येथून सुरू झालेल्या या दौडीचा समारोप पिंपरी चौक येथे झाला. यावेळी उपस्थितांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून संविधानातील मूल्यांचे जतन करण्याचा संकल्प केला. त्यानंतर महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापौर मा. रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



पिंपरी येथील भीमसृष्टी शेजारील मैदानावर दिवसभर विविध प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कबीर नाईकनवरे, कुणाल वराळे, माया विजय सरतापे प्रस्तुत विजय सरतापे व सहकारी, एस. के. प्रोडक्शन प्रस्तुत चंद्रकांत शिंदे तसेच सुनंदाई कला, मुंबई प्रस्तुत योगेश विठ्ठल पवार यांनी प्रबोधनात्मक गीतगायनातून संविधानातील विचार आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला.

सायंकाळी संविधान अभ्यासक नूरखा पठाण (माणगाव, महाड) यांचे 'भारतीय संविधान' या विषयावर विशेष प्रबोधनपर व्याख्यान झाले. संविधानाची निर्मिती, त्यातील मूलभूत तत्त्वे, नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी पिंपरी चौक येथे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते मुख्य प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त अण्णा बोदडे, महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. संविधान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमांमधून नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच लोकशाही मूल्ये, सामाजिक समता आणि बंधुतेचा विचार अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रबोधनात्मक गीतगायन आणि व्याख्यानांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कामगार मुलांच्या शिक्षणाला स्थलांतराचा ब्रेक

पिंपरी । प्रतिनिधी

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये रोजगाराच्या शोधात येणाऱ्या कामगार कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनत आहे. बांधकाम प्रकल्प आणि विविध उद्योगांत काम करणाऱ्या कामगारांना रोजगाराच्या स्वरूपानुसार वारंवार राहण्याचे ठिकाण बदलावे लागते. मात्र, पालकांच्या रोजगारासाठी सुरू असलेल्या या स्थलांतराचा थेट परिणाम त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर होत आहे.

कामगारांचे कामाचे ठिकाण बदलले की त्यांच्या पाल्याची शाळाही बदलावी लागते. नव्या शाळेत प्रवेशासाठी धावपळ करावी लागते आणि पुन्हा नव्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. या सगळ्या प्रक्रियेत मुलांच्या शिक्षणाचे सातत्य हरवण्याची भीती निर्माण झाली आहे. महापालिकेच्या सर्वेक्षणातूनही स्थलांतरित बालकांची संख्या समोर आली असताना, या मुलांचे शिक्षण अखंडित ठेवण्याची जबाबदारी आता महापालिका शिक्षण विभागासमोर उभी ठाकली आहे.



शाळा बदलली की, अभ्यासाचे गणितही बिघडते!

कामगार कुटुंबांचे स्थलांतर अनेकदा अचानक होते. कारखान्यातील काम संपणे, ठेकेदार बदलणे, बांधकाम प्रकल्प पूर्ण होणे किंवा दुसऱ्या ठिकाणी रोजगाराची संधी मिळणे, अशा कारणांमुळे कुटुंबाला राहण्याचे ठिकाण बदलावे लागते. अशावेळी मुलांच्या शाळेचा प्रश्न निर्माण होतो. मागील शाळेची कागदपत्रे, शैक्षणिक नोंदी आणि नव्या शाळेतील प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करताना पालकांची दमछाक होते. अनेक कामगारांना रोजंदारीवर काम करावे लागत असल्याने प्रवेशासाठी वारंवार शाळांमध्ये जाणेही शक्य होत नाही.

शाळा बदलल्यानंतर अभ्यासक्रम, शिकवण्याची पद्धत आणि भाषेतील फरक यांच्याशी मुलांना जुळवून घ्यावे लागते. विशेषतः परराज्यांतून आलेल्या मुलांसाठी मराठी माध्यमातील शिक्षण समजून घेणे सुरुवातीला आव्हानात्मक ठरू शकते. काही मुले नव्या शाळेत दाखल होतात. मात्र, आधीच्या अभ्यासक्रमातील तफावतीमुळे त्यांचा शैक्षणिक पाया कमकुवत होण्याची शक्यता असते. वारंवार शाळा बदलण्याच्या या प्रक्रियेत मुलांचा आत्मविश्वासही कमी होऊ शकतो, असे शिक्षक तसेच पालकांचे मत आहे

स्थलांतरित बालकांच्या शिक्षणाचे वास्तव शाळाबाह्य आढळलेली बालके : १२४ शाळेत दाखल केलेली बालके : ११७ अनियमित उपस्थिती असलेली बालके : ७ पिंपरी-चिंचवडमधून स्थलांतरित बालके : १२५ पुणे जिल्ह्यांतर्गत स्थलांतरित : ४९ अन्य जिल्ह्यांत स्थलांतरित : ७० परराज्यात स्थलांतरित : ६ शिक्षण हमीपत्र दिलेली बालके : ११७ अन्य भागांतून पिंपरी-चिंचवडमध्ये आलेली बालके : २२७ शहरात दाखल झालेली स्थलांतरित बालके : २२७ कालावधी : १५ ते ३० जुलै २०२६ स्थलांतरित कामगारांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी महापालिकेच्या शाळांमध्ये त्यांना कधीही प्रवेश घेता येतो. प्रवेशासाठी दाखल्याअभावी मुलांना अडवले जात नाही. संबंधित संस्था किंवा पालकांकडून उपलब्ध माहितीनुसार मुलांचे प्रवेश करून घेतले जातात. त्यानंतर यू-डायस प्रणालीवर आवश्यक शैक्षणिक नोंदी व दाखल्यांची पूर्तता केली जाते. त्यामुळे कागदपत्रांअभावी कोणत्याही मुलाचे शिक्षण थांबू नये, याची दक्षता घेतली जाते.

– संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग

'रायगड बिझनेस एक्स्पो २०२६; माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते भव्य उद्घाटन

नवउद्योजक व व्यावसायिकांना एकच व्यासपीठ; संघटित उद्योजकीय शक्तीतून रायगडच्या विकासाला नवी झेप : सागरीका जांभळे

खालापूर । आलिशा शेख

रायगड जिल्ह्याच्या औद्योगिक आणि व्यावसायिक विकासाला नवी दिशा देण्यासोबतच स्थानिक उद्योजक, महिला व्यावसायिक आणि नव्या पिढीतील व्यावसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करू; देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'रायगड बिझनेस एक्स्पो २०२६' या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी एन. डी. स्टुडिओ येथे माजी खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. रायगड जिल्ह्यातील होतकरू युवती सागरिका शेखर जांभळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या तीन दिवसीय उपक्रमाला पहिल्याच दिवशी शेकडोहून अधिक स्टॉलधारकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. प्रारंभी गणेशपूजन, शिवपूजन, दीपप्रज्वलन आणि महामानवांना अभिवादन करून ढोल-ताशा व लेझीमच्या



गजरात कार्यक्रमाचा भव्य शुभारंभ व मान्यवरांचे स्वागत सन्मान करण्यात आले. यावेळी आयोजक सागरिका शेखर जांभळे, ज्येष्ठ मार्गदर्शक किशोर शेळके, डॉ. विजय पिल्लेवाल, डॉ. मारुती पवार, यचीत दिवाण, सरपंच रितू ठोंबरे, अश्विनीताई पाटील, डॉ. शेखर जांभळे तसेच एन.डी. स्टुडिओचे व्यवस्थापक तथा आयोजक महेश भंगारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या कल्पना, कौशल्य आणि क्षमतेच्या बळावर उद्योजक बनावे, रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, हा या प्रदर्शनामागील महत्त्वपूर्ण दृष्टिकोन असून. उद्योजकीय क्षमता, व्यावसायिक कल्पकता आणि आर्थिक स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्यासाठी सागरिका जांभळे यांनी पुढाकार घेतला आहे.

जिल्ह्यातील अन्य नवउद्योजकांनाही संधी उपलब्ध करून देण्याची आयोजकांचा उद्देश निश्चितच प्रेरणादायी ठरत असून रायगड बिझनेस एक्स्पोच्या संपूर्ण टीमचे आणि उत्कर्ष इव्हेंट प्रोडक्शन यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक व शुभेच्छा त्यांना देण्यात आल्या.

या प्रदर्शनात शेकडोहून अधिक स्टॉलधारकांनी सहभाग नोंदविला असून, विविध व्यवसाय, उत्पादने, सेवा आणि व्यावसायिक संकल्पनांना एकाच छताखाली सादर करण्याची संधी उपलब्ध झाल्याने आयोजकांचे आभार मानले. उद्योजक, उत्पादन दर्जा, मूल्यांकन, उपलब्धता, ग्राहक तसेच थेट संपर्क साधण्यासाठी या प्रदर्शना कडे मोठया अपेक्षेने पाहिले जात आहे. पुढील दोन दिवस नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभेल आणि प्रदर्शनाला आणखी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षाही स्टॉलधारकांनी व्यक्त केली. रायगड जिल्ह्याचा विकास केवळ मोठ्या उद्योगांच्या विस्तारातून नव्हे, तर स्थानिक व्यावसायिक, कुशल मनुष्यबळ, महिला उद्योजिका, आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार उत्पादननिर्मितीच्या एकत्रित सहभागातून लाभदायी उद्देश साध्य होऊ शकतो. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.